
# मनस्पर्शी

शब्दसखी



# मनस्पर्शी

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मनस्पर्शी

## शब्दसखी

डॉ. संगीता गोडबोले

ई साहित्य प्रतिष्ठान

# मनस्पर्शी (ललित)

लेखिका :      शब्दसखी

डॉ. संगीता गोडबोले

कल्याण.

मोबाईल नंबर.  ९८२०३५४७३४

sgodbolejoshi@gmail.com

मुखपृष्ठ वित्र : मीरा कुलकर्णी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २१ मार्च २०१९(धुळवड)

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

*मनस्पर्शी*

---

**शब्दसखी – डॉ. संगीता गोडबोले**



**अर्पणपत्रिका**

*माझी आजी*

*यमुना गोपाळ जोशी*

हिच्या पवित्र स्मृतीस .....

# प्रस्तावना

## “ मुक्त-गद्य... गद्य-काव्य"

‘ *हे सारस्वताचे गोड तुम्हीच लावले जी झाड* ’

असे जेव्हा ज्ञानेश्वर म्हणतात तेव्हा “ जे सरस्वतीचे उपासक ते ते सारे सारस्वत” असाच अर्थ अभिप्रेत असावा. मराठी वाङ्मय किंवा साहित्य याचा अवकाशपट खूपच व्यापक आहे. साधारणपणे आपण ललित व ललिततेर अशी प्राथमिक वर्गवारी करीत असतो.. ललित साहित्य म्हणजे एकप्रकारचे कुठल्याही विषयावरचे मुक्तचिंतन !! कुठल्याही भाषेतील शब्दाचा नाद व अर्थ हे ‘ सहित ‘ म्हणजेच एकत्र जुळले की साहित्य निर्मिती होते.. सध्या प्रसिध्द होणा-या आधुनिक मराठी वाङ्मयात सर्वसामान्य माणसांच्या लौकिक सुख - दुःखांचा शोध घेत, एखादा विचार सोपा करून रंजक सांगत, आत्मीयतेने अनुभवाची मांडणी करणारे ललित लेखन वाचकप्रिय झाले आहे. या मधे ललित लेख, लघुनिबंध वा स्फुट या लोकप्रिय लेखनप्रकाराचा समावेश होतो. बालपणीचे अनुभव, गतकालीन घटना व प्रसंग, गतकाळातील आयुष्य व तेथील ऋणानुबंध व त्याचे स्मृतीरंजन, व त्यामुळे खंतावलेले मन यांचे उत्कट दर्शन “मी"चे मुक्तपणे आविष्करण असल्यामुळे अशा लेखामधून दिसून येते. क्वचित त्या स्मरणरंजनाच्या आधारे सध्याच्या जीवनाला पल्लवित करण्याची सकारात्मक प्रवृत्तीही आढळते...

अशा ललित लेखनाचा विकास व प्रसार मुख्यत वृत्तपत्रांच्या स्तंभलेखना मधूनच झालाय. सध्याच्या सोशल मिडियाच्या जमान्यान लेखन प्रसिध्द होणे सोपे झाले आहे. कवितेसोबत. तरूणाईचा हा अभिव्यक्त होण्याचा आवडता साहित्य प्रकार आहे.. आणि अशा अपार सागरात जेव्हा एखादे असे माणिक गवसते.. जे आपल्या ललित लेखनामधून उत्कट भावाविष्कार व काव्यात्म मनोवृत्तीची साक्ष देणारे असते, तेव्हा दर्जेदार व श्रेष्ठ प्रतीच्या अभिजात साहित्याच्या आस्वादातून अलौकिक आनंद मिळतो असेच काहीसे ‘ शब्दसखी ‘ चे हे मुक्त-गद्य हाती आल्यापासून झाले आहे.. ताजंतवानं करणारी मंद झुळुक बागेत पसरल्यासारखी...

गेले कित्येक महिने‘ **शब्दसखी’ डॉ. संगीता गोडबोले** चे ललित लेख वाचतेय. अपरंपार निष्ठेने रोज रवीकिरणांच्या प्रवेशासह एक नवीन पुष्प आढळते. वाटच बघत असते..

वाचल्यावर प्रथम जाणवतं ते विषयां मधलं वैविध्य.. आणि त्याला लाभलेली व्यासंग व अभ्यासू वृत्तीची गहिरी जोड !

*“मीच देवकी मीच यशोदा*

*मी मीरा अन् मीच राधिका*

*मीच द्रौपदी मीच सुभद्रा*

*मी मुरली अन् मीच गोपिका*

*माझ्यातील मी”*

असे म्हणत सीता, राधा रुक्मिणी यशोधरा अशी *सनातन* काळातली महानायिका इथे भेटते, कृष्ण, त्याची बासरी मोहात पाडते.. तर सद्य परिस्थितीचे प्रखर भान असल्यामुळे “ **वीरपत्नीचे मनोगत** “ देखिल तितकेच उत्कट उतरते.. जेव्हा ती म्हणते,

“‘ *खंत नाहीच रे तुझा सहवास न मिळाल्याची “*

इथे भेटणारी प्रत्येक व्यक्तिरेखा जरी वाचकाला सुपरिचित असली तरी त्यांचा नव्याने विचार करतांना मनाला भेडसावणारे प्रश्नांची मांडणी नीटसपणे ही **शब्दसखी** करते. इथे **यशोधरा** व्यथित होते...

गौतम बुध्दाला सांगते...

“ *तुमची पत्नी... आता गतकालातील.. असं म्हणणच योग्य ठरेल. कारण सर्वसंगपरित्याग करुन आत्मज्ञान अन् सिद्धीप्राप्तीकरता ज्या क्षणी रात्रीच्या अंधारात पदरात एक मूल टाकून तुम्ही उंबरठा ओलांडून गेलात, त्याच क्षणी माझं आणि तुमचं पती-पत्नी हे नातं क्षणार्धात संपलं होतं. लौकिकार्थानं आणि तुमच्या मनातही.... पण मी मात्र पत्नी राहिले नसूनही स्नुषा आणि माता हे पद आणि नातं सांभाळत राहिले..... तरीही प्रत्येक क्षणी माझ्या वेदनेची किनार छळत राहिली”*

लेखिका एके ठिकाणी जेव्हा म्हणते

“... *नाविन्य हवं असतं आपल्याला.*

*आयुष्याचं पुस्तक कसं भरगच्च भरलेलं असावं... घडामोडींनी... माणसांनी.. विचारांनी आणि कृतींनी.. छानशा गोष्टींची नोंद... पुढेमागे हीच आठवणींची मोरपिसं... हळूवार गालावरुन फिरवताना.. ते क्षण जसेच्या तसे... आपल्याच शब्दात रोज उगवणारा सूर्य जरी तोच असला तरी मावळेपर्यंत कितीतरी नव्या अनुभवांनी समृद्ध होऊन गेलेला असतो “*

तेव्हा नकळत ती तिची आयुष्याकडे बघण्याची भूमिकाच

मांडत असते आणि जाणवतो तो तिचा अव्याहत सुरू असलेला मनाचा शोध !

*“आज तुझी आठवण येतेय. मनाची खिडकी उघडीच राहिली वाटतं”*

*“थोडीफार डागडुजी करु... पडझड झालेली जराशी पुन्हा लिंपून टाकू.. थोडी रंगरंगोटी करून तयार करु मनाला... पुन्हा उभं रहायला”*

“ *शब्दांचा पाऊस मनभर रिमझिमत होता नि त्यात हे असं आकाश काळया मेघांनी झाकोळून गेलेलं”*

किंवा

*“... या मनातल्या पावसाच्या वाटा मात्रं ओठाकडे वळवलेल्या..*

*डोळयातून झरायची परवानगी नाकारलेली “*

अस सहज लिहून जाते तेव्हा हे गद्य लेख तिच्या उत्कट प्रतिभेने मुक्त काव्यच बनते व आपले ***शब्दसखी*** हे नाम सार्थ करते. तरल प्रतिभाविष्काराला तिच्या सुरेख व समर्पक शब्दकळेची अजोड साथ आहे. ह्या ***शब्दसखी*** संगीताने शास्त्रीय संगीताचे रीतसर शिक्षण घेतल्यामुळे गाण्यासंबंधी बरेच अभ्यास दर्शवणारे सुरेल संदर्भ उमटतात आणि ही बनते **सूरसखी**.. इथे **तानपुरा** साथसंगत.. समर्पण... अन् एकरुपता यांचे प्रतिक होतो. ही प्रतिकांची भाषा फार मनोरम झाली आहे.. “तू” शी होणारे संवाद हा तिचा एक प्रकारचा अंतर्शोधच आहे.

“आयुष्य *प्रश्नचिन्ह नसून निसर्गाने विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर आहे.. प्रत्येकानं आपापल्या परीनं सोडवण्याची तिथे मुभा आहे आणि त्याचा आनंद उपभोगण्याचं स्वातंत्र्यही “*

हे सगळे लेख बव्हंशी मुक्तचिंतन आहे

अशा लेखकाच्या अनिर्बंध स्वातंत्र्याचा मात्र इथे योग्य तोच उपभोग घेतला आहे. कदाचित **शब्दसखी** स्वत: एक प्रथितयश डॉक्टर असल्यामुळे शास्त्रीय विचार करण्याची मनाला सवय असणारच.. त्यामुळे विषयवस्तूच्या मांडणीत विस्कळीतपणा नसून नीटनेटकी बांधणी आहे जरी हे लेखिकेचं पहिलंच.. ई पुस्तक आहे.

“***आजी”*** व “***बोरकरांवर*** लिहिलेली व्यक्तीचित्रे मनाच्या गाभ्यातून खोल रुतलेल्या आठवणीचा सुखद आविष्कार आहे..

“बाकीबाब आमचीही मनं त्यांच्या कवितेसारखीच चिरतरुण करुन गेले”

आजी   *“न बेरीज वजाबाकीत उपभोगातील फक्त 'भोग'च बाकी राहिले. ”*

*“आजीचा जन्म धुळवडीचा. पण सगळयांच्या आयुष्यात रंगपंचमीच्या सप्तरंगांची उधळण करुन गेली”*

असं वाचल्यावर आपण ही आपल्या  आठवणींत  हरवून जातो.. हेच लेखक व वाचकाचे तादात्म्य ! सायुज्य !

तेच प्रवासवर्णना बद्दल.. निसर्गाचे वर्णन म्हणजे कविमनाचा इतका उत्कट आविष्कार असतो की नेहेमीचाच मुंबई पुणे हायवे नव्याने भेटतो..

श्रावणवैभव वर्णन करतांना तिच्यातली हळवी आई, गूळ घालून शिजवलेल्या पुरणाच्या वासाने दूरवर असलेल्या लेकरांच्या आठवणीने  गलबलते.

अशा लेखांनी समृध्द पुस्तक संपवल्या शिवाय खाली ठेववत नाही. वाचतांना “ती” ची अनंत रूपे आपल्या समोर उलगडली असतात.

“'ती' नेमकी काय असते?

म्हटलं तर... ती तशी फार अल्पसंतुष्ट असते.

छोट्या छोट्या गोष्टीत सुखाचे क्षण शोधत असते नि

आनंदाचा सडा शिंपित असते... ”

अशा एका संवेदनाशील सुसंस्कृत व अभिजात साहित्यनिर्मिती

करणा-या शबद्सखीकडून येत्या काळात खूप अपेक्षा आहेत.. त्यासाठी

मनापासून शुभेच्छा¡

व प्रथम ई प्रकाशनानिमित्त हार्दिक अभिनंदन !!

.. मीरा कुलकर्णी

पुणे..

# मी ..... शब्दसखी..



खरं म्हणजे लिहिण्याची सुरवात नक्की कधी झाली हे नाही सांगता येणार. अशाच एका बेसावध क्षणी मला मनातलं कागदावर उतरवावंसं वाटलं. आणि मग ते तसं वाटतच राहिलं. रोजच्या रोज नवं दिसत राहिलं. खरं तर त्यापूर्वीही दिसायचंच की डोळयांना.. पण आता 'नजर' मिळाली होती. मग ते नवेपण सतत खुणावत राहिलं. आणि मग काही ना काही सुचत राहिलं.. कधी ललित कधी कविता... कधीकधी दोन्हीचं मिश्रण.

कोणत्याही एखाद्या चौकटीत बसवून त्याला नाव द्यावसं नाहीच वाटलं मला.

मनातल्या विचारांचं हे असं उत्स्फुर्त प्रगटीकरण मात्र मनाला आनंद देत राहिलं. कधीतरी पेरलेलं यथावकाश योग्य वेळी, योग्य परिस्थितीत उगवतं.. फोफावतं म्हणतात. तसंच काहीसं  झालं असावं.

लहानपणापासून मराठी उत्तम साहित्य वाचण्याची आवड उत्पन्न व्हावी म्हणून आई दादांनी साने गुरुजी, किशोर मासिक चांदोबा, राणी कित्तूर चन्नम्मा झाशीची राणी गांधीजी सावरकर आणि इतर मोठया लोकांच्या उद्बोधक  कथा वाचनासाठी आणून दिल्या. वयानुसार विषय बदलत गेले. मग आपसूकच बऱ्या वाईटातला नीरक्षीर फरकही करता येऊ लागला. शाळेत गायन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यात अनेक बक्षीसे मिळाली, ती पुस्तकांच्या रुपात. अरविंद गजेंद्रगडकरांचं एक जुबिन मेहता, परवीनजी सुलताना वगैरे संगीत क्षेत्रातील दिग्गजांबद्दल माहिती असलेलं सातवीत बक्षीस मिळालेलं पुस्तक हे संगीत विषयक पुस्तकं वाचण्यासाठी स्फुर्ती देणारं ठरलं. त्यात शास्त्रीय संगीताच्या शिक्षणाचा सहभागही नाकारता येणार नाही.

नववीत असताना दादांची तळेगावला झालेली बदली.

गो नि दांडेकर, आप्पांचीची ओळख आणि वारंवार भेटी. दहावीला तळेगाव ऍंड. पु वा परांजपे विद्या मंदिरात दहावीत सर्वप्रथम आल्याबद्दल गो. नि. दां. चं पहिलं बक्षीस आणि आशीर्वाद.

निपाणीला ताईकडे दहावीच्या सुटीत सुधीर मोघेंची पहिली भेट.. पुढे वारंवार कुठल्या ना कुठल्या कार्यक्रमाच्या निमित्तानं झालेल्या भेटी.. लय, पक्षांचे ठसे शब्दधून यांच्यासारख्या पुस्तकांमधून कवितेबद्दल आत्यंतिक जिव्हाळा उत्पन्न झाला. कविवर्य सुधीर मोघेंनीच रॉय किणीकर, भाऊसाहेब पाटणकर ग्रेस यांच्या कवितांची ओळख करुन दिली

शांताबाई इंदिराबाई बा. भ. बोरकर सुरेश भट, नारायण सुर्वे, बहिणाबाई, ना ध महानोर, कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर सगळयांशी वाङमयीन दोस्ती होत राहिली. कविता पानोपानीचे सुधीर मोघेंचे अनेक कार्यक्रम मिरज सोलापूर कल्याण.. मग त्यानंतर रंगलेले रात्रभराचे गप्पांचे फड.

या सगळयांचा परिपाक म्हणजे लिखाणाची स्फूर्ती असच म्हणावं लागेल.

१९९१ सालापासून बालरोगतज्ञ म्हणून काम करताना विविध लोकांशी आलेला संपर्क, अनुभव याचाही सहभाग नक्कीच आहे.

Whatsapp सारख्या मिडियाचा वापर आपण कसा करतो यावरही बरंच अवलंबून असतं. यावरच्या एका 'महेफिल' ग्रुपवर कवयित्री गौरीताई कुलकर्णी, गायिका पद्मश्री पद्मजाताई फेणाणी, सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक पंडित मुकुंददादा पेटकर, पद्मश्री शरद काळे सर, मीराताई कुलकर्णी यासारख्या लोकांशी ओळख आणि त्यातून मिळणारे प्रोत्साहन हेही माझ्या लिखाणास प्रवृत्त करणारे ठरले.

या सगळयातून तयार झालेलं हे E book. पहिल्यांदाच करतेय हे सगळं. त्यामुळे अभिप्रायांविषयी उत्सुकता असणार आहे. यानंतर शास्त्रीय रागांवरच्या कविता, व्यक्तीचित्रे,

निसर्ग कविता, अशा विषयांवरही पुस्तक तयार करण्याचा मानस आहे आणि तसे कामही सुरु आहे. माझा 'मनस्पर्शी ' नावाचा Blog ही आहे.

drsangeetagodbole.wordpress.com

माझी ही पहिलीच कलाकृती वाचकांपुढे ठेवताना आनंद वाटतोय. लिहिलेल्या गोष्टी बंद कपाटात किंवा मनातल्या मनातच राहू नयेत ,यासाठी त्या लिहिण्यास प्रवृत्त करणाऱ्या या माझ्या दोन जिवलग मैत्रीणी. कल्याणमधील सर्जन डॉ वैष्णवी देव.

आणि पुण्याची मीराताई कुलकर्णी. मीराताईनं तर सर्वच प्रकारे स्फूर्ती दिली आणि अगदी फाईल्स बनवण्यापासून सर्व प्रकारे मदतही केली. मुखपृष्ठासाठी सुंदर आणि सुयोग्य पेंटिंग करुन दिलं. तिचे आभार मानणं शब्दांपलीकडे आहे हे तर खरच .आभार हा शब्द वापरुन तिचा अवमानही करायचा नाही मला .पण तरीही तिनं माझ्याकरता जे केलय त्याचा उल्लेख केल्यावाचून रहावत नाही म्हणून ...

माझे पती डॉ. राजेंद्र गोडबोले Urosurgeon, यांच्या सहकार्याशिवाय हे शक्य झाले नसते.

केवळ म्हणूनच ....

यापुढेही अशाच कलाकृती आपणापुढे सादर करता याव्यात अशी इच्छा.

शब्दसखी
डॉ. संगीता गोडबोले, कल्याण.
मोबाईल नंबर. ९८२०३५४७३४

मनस्पर्शी



1. सीता...
2. दुपार तशी टळून गेलीय.
3. समर्पण.
4. प्रिय... कन्हैया...
5. बोल ना
6. यशोधरा...
7. रुक्मिणी
8. तानपूरा
9. पाऊस.
10. पाऊस ... पुनः पुनः
11. परिभाषा ...फुलांची
12. रोजनिशी
13. पुस्तक ...आयुष्याचं
14. अर्थ स्वप्नांचे
15. अंतर्मुख
16. गीतनिर्मिती
17. ओंजळभर सूर
18. तानपुरा
19. मुंबई पुणे ..... हायवे
20. पुणे मुंबई हायवे.....
21. ती....
22. गुड नाईट....
23. बाकीबाब
24. सम.....
25. तुझ्याविना .... ??,
26. वीरपत्नीचे मनोगत....
27. डागडुजी... मनाची
28. End stage disease, ..
29. आयुष्य...प्रश्न ...की उत्तर...
30. श्रावण....
31. आजी.....

# सीता...

आदिकवी वाल्मिकींच्या २८००० श्लोकांत गुंफलेल्या रामायणाची नायिका...

पावसाच्या आगमनासाठी इंद्रदेवतेची आराधना करण्यासाठी जनक राजाने चालविलेल्या नांगराच्या फाळयात अडकून सापडलेली (सीत... नांगर) सीता...

मिथिला नगरीच्या राजाची जनकाची मानसकन्या... मैथिली...

मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे.. म्हणून पोटात दोन गर्भ घेऊन जंगलात टाहो फोडणारी... माता सीता...

एकवचनी, एकबाणी,

एकपत्नी  श्रीरामाची लाडकी राणी... सीता..

लवांकुशासारख्या कुशाग्र लेकरांची माता...

राम 'राजा'च्या आज्ञेनुसार, लोकापवादास कारणीभूत ठरु नये म्हणून अग्निदिव्याला सामोरी गेलेली अन् त्यातून अधिक तेजाने उजळून निघालेली... सीता..

पुन्हा राजवाड्याचे वैभव नं भोगता, धरणीमातेला दुभंगून पुनश्च एकवार पोटात घेण्याची विनंती करणारी... पूर्वजन्मीची... वेदवती

अशोक वनात सुमारे दोन वर्षे आपल्या पतीची सुटकेसाठी वाट पहाणारी अन् रावणाला स्पर्श करण्याचे धारिष्ट्यही न करु देण्याचे सामर्थ्य असलेली... सीता.

ज्यांच्या नुसत्या नामस्मरणानेही महापातकांचा नाश व्हावा अशा पंचकन्यांपैकी एक...

किती रुपं.. किती भूमिका.. साऱ्यांचं मूळ तिच्या 'स्त्री'असण्यात होतं का?

जनकाची थोरली कन्या म्हणून मिरवताना मोठेपणाचा हार पडला गळयात. पण धाकटया उर्मिलेहून अधिक तिच्यावर प्रेम केल्याचं शल्य टोचलं असेल का तिच्या मनाला?

१४ वर्ष वनवास भोगला खरा... पण श्रीरामासारख्या पतीबरोबर..

तेव्हा लक्ष्मणाच्या विरहाने पोळलेल्या उर्मिलेची दया आली असेल तिला ?

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर भोगावे लागणारे कष्ट, दुःखं झेलली तिनं आनंदानं.

राजा दशरथाच्या आज्ञेनुसार आणि कैकयीच्या हट्टापायी श्रीरामाच्या १४ वर्षे वनवासाला जाण्याच्या निर्णयाला तिनं मूकपणे साथ दिली नि सारं वैभव बाजूला सारून ही राजकन्या आणि राजस्नुषा वल्कलं नेसून सारे दागिने उतरवून पतीमागे निघाली, तेव्हा अधिकच तेजःपुंज दिसली असावी.

पातिव्रत्याच्या तेजाने उजळून निघाली असावी ती.

दैव कोणाला कुठे नेईल याचा भरोसा नाही.

कोणत्या का कारणाने होईना.. एका राजस्नुषेच्या आणि राणीच्या पदरी कुठेतरी जंगलात रहाण्याचे भविष्य  तिच्या भाळावर लिहून गेली नियती..

दोन गोंडस पराक्रमी सुपुत्रांना जन्म देऊन ती धन्य तर झालीच असणार पण भोगाव्या लागलेल्या यातना नि कष्टाकडे तिने कोणत्या दृष्टीने पाहिले असेल ?

लवकुशांना प्रभू रामचंद्राच्या स्वाधीन करुन आपला कार्यभाग संपला हे गृहीत धरुन धरणीमातेला पुन्हा एकदा दुभंगण्याची विनंती करुन जिथून आली  त्याच धरित्रीच्या पोटी पुन्हा विसावलेली ही अवनीकन्या... सीता...

# दुपार तशी टळून गेलीय.

मृगाची चाहूल लागलीये. नि आसुसलेपण अगदी रुंजी घालतय आजूबाजूला.. पावसाच्या पहिल्या थेंबांसाठी...

माझ्या गावापासून पाऊस तसा अजून दूरच आहे... तुझ्या गावात मात्र त्यानं आपलं बस्तान बसवायला सुरवात केलीय. माझं आकाश अजूनही निरभ्रच.. तुझ्याकडे मात्र अगदी ओथंबलय  काळया सावळया मेघांनी... हे खरं तर तू मला सांगायची गरजच नाही.. तुझ्या फोनची रिंग वाजली की कळतच आता... अशावेळेस तुझ्याखेरीज असणारच नाही कोणी.

नेहेमीचं hello नाहीच आता...

बाहेर पाऊस... आत मन

दोन्ही भरुन आलय..

बघूया... पहिल्यांदा कोण बरसतय.. अशी फक्त शब्दांची पखरण...

हे असं आभाळ भरुन येताना तुझे डोळे नि मन भरुन येणं काही नवीन नसतंच माझ्यासाठी..

तुला कुठंतरी ते सांगायचं असतं.. अगदी मनापासून.. मग तुला माझी आठवण येते हे मला पक्कं ठाऊक असतं...

आणि म्हणूनच.. सहज म्हणून गेले मी..

भरलेल्या मनाची

वाट जाते डोळयातून

काजळरेषा होईन मी

अश्रू थोपवेन आतून...

तुझं  साशंक मनानं  माझ्याकडे मनातल्या मनात असं निरखून पहाणं...

कळतय मला नं पहातासुद्धा...

जाणवतय ना तुझ्या श्वासातून...

असं का बरं ?

अजूनही  विश्वास नाही बसत?

कसं सांगू तुला?

तुझ्या मनाचे रस्ते..

आता माझ्याही ओळखीचे..

उजेड असो वा अंधार ...

आता नक्कीच नाही चुकायचे.

तू असं मनभर काहूर घेऊन नको ना जगूस...

पाऊस यायलाच हवा.. सरीवर सरी बरसायलाच हव्या..

बरसू दे ना पावसाला
तुझ्यासंगे भिजेन मी
अंतर्बाह्य  होऊन ओली
जगेन ना थोडी मीही..

तू आता नको... नको ना म्हणूस पावसाला येऊ दे ना... खरंच...

पाऊसही येईल मग..
कोवळ्या सरी घेऊन
फिरेन तेव्हा तुझ्यासंगे
तुझंच बोट धरुन...

लहानपणचा पाऊस... आता फक्त डोळ्यातच साठतो
नि तुझ्या आठवणींसकट
हळूहळू नजर चुकवत  पाझरतो..

भेटेन नं तुला मी...

खरंच भेटेन...

पायानं पाणी उडवत

मस्त मस्त हुंदडेन

हरवलेलं बालपण

मी पुन्हा पुन्हा  शोधेन..

तुझं माझं नातं असं.. नेहमीच फुलतं

एकमेकांच्या संगतीनं

बालपण गवसतं..

या नात्याला मग मला काही नावच सुचत नाही.

निरागस  दोस्तीपलीकडं

काहीच दिसत नाही..

आपण नं आता असंच करु...

वयाच्या  गणिताची

पर्वाच नाही करायची

हुकलेली सारी वर्ष

ओंजळीत पकडायची.

असं सारं मला पुन्हा  तुझ्याच बरोबर अनुभवायचय

मोठेपणच्या जगण्यातसुद्धा...

बालपण जगवायचय.

फक्त एकच कर..

तू मात्र नको म्हणूस

बाहेर पाऊस

आत मन..

दोन्ही भरुन आलय

बघूया..

पहिलं कोण बरसतय...



# समर्पण...

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर... खरंच कृष्ण भेटला मला !!!!!

कधी रांगणारा बाळकृष्ण होऊन तर कधी नटखट नंदकिशोर,

कधी  मनमोहन बन्सीधर, कधी रंगाची बरसात करणारा रंगनाथ,

कधी गोविंद कधी सामर्थ्यवान श्रीकृष्ण..

कधी बंधू, कधी सखा तर कधी पुत्र होऊन...

प्रश्नकर्ताही तूच अन्

उत्तरदाताही तूच..

जीवनाच्या महाभारतातील युद्धाच्या प्रत्येक क्षणी सामर्थ्यदाता झालास.

भोगण्याचं, सोसण्याचं, प्रतिकाराचं अन् जगण्याचं सामर्थ्य दिलंस.

नश्वर जगात ईश्वर होऊन आलास.

मुरलीच्या सुरांवर नादावण्याचं अन् बुद्धीसामर्थ्यावर तगण्याचे कसब.. हेही तुझेच देणे...

आता तर..

मीच देवकी मीच यशोदा

मी मीरा अन् मीच राधिका

मीच द्रौपदी मीच सुभद्रा

मी मुरली अन् मीच गोपिका

माझ्यातील मी, तू माझा  पण..

फक्त समर्पण...

फक्त समर्पण

सारे जीवन श्रीकृष्णार्पण..

# प्रिय... कन्हैया...

प्रिय... कन्हैया...

एका बेसावध क्षणी हातातला हात अलगद सोडवून घेतलास... कळलंच नाही फक्त हातातला हात सुटला... की साथही...

मनातले सूरही सांडून गेले एवढ्याशा धक्क्याने.. नि शब्दसुद्धा पार मुकेच होऊन गेले..

मी काहीच कुरकुर नाही केली... ना कोणाला दूषणं दिली. फक्त

माझ्या मनाची कवाडं मात्र   घट्ट बंद करुन

घेतली... नको.. आता नकोच.. किलकिलत्या फटीतूनसुद्धा सुरांचा प्रवेश नको... साऱ्याला दूर सारुन आलेच पुन्हा ते स्वर...

बेधुंद करणारी तुझी बासरी... तिचे सूर... जितके मी दूर सारावे म्हणते, तितकेच किंबहुना अधिक जवळ येतात बिलगतात... सारं आयुष्यच व्यापून टाकतात... मग गोकुळवासी म्हणतात ना... मनमोहनापायी... त्याच्या विरहापायी पार वेडीच झालीय राधा...

म्हणू देत बापडे... त्यांना काय सांगू की राधा... मोहन कधी वेगळे नव्हतेच मुळी... कृष्ण तिचा सखा होता.. सोबती होता आधार होता.. आनंद होता.. जीवनाचं स्वत्व होता.. जीवनदाता होता... सारं काही कृष्णमय...

मग आत्माच काढून घेतल्यावर उरतच काय मागे?

सचेतन नव्हे तर... अचेतन शरीर..

त्या जगण्याला मुळी अर्थच कुठे आहे?

तो कृष्णसुद्धा असा ना...

एकवार मागेही नाही वळून पाहिलं... मी गेलो तर राधा कशी राहील...

की खात्रीच होती त्याला... माझ्याविनाही राधा तशीच राहील...

नक्की काय बरं नातं होतं ?

वयानं कितीतरी लहान असणाऱ्या मुलाची ती छानशी मैत्रीण होती. रंगाची बरसात केली की खुलणारी सखी होती. अन् बासरीच्या सुरांवर जगणारी ती एक स्वरप्रेमिका होती.

फार विशुद्ध आणि तरल नातं होतं..

समाजाच्या चौकटीबाहेरचं अनामिक... सर्वसामान्यांच्या आकलनापलीकडचं... आणि लोकांना काय वाटेल... याची तमा न बाळगणारं...

त्यांच्यासाठीचं...

त्यांच्यापुरतं...

अदृश्य अन् अशरीरी...

काही काळासाठीच्या सहवासाचं पण अजरामर असं अद्भुत...

परंपरा अन् रुढीविरुद्ध धावणारं... चिरकाल त्रिकालाबाधीत...

खरंखुरं मैत्र...

# बोल ना

अगं बोल ना काहीतरी..

तेच चाललंय... बोलतेच आहे..

काय?...

अगं मला कसं नाही ऐकू येत मग?तुझे साधे ओठही हललेले नाही दिसत मला...

नाहीच दिसणार..

please, . link नको नं तोडूस...

हं... आता काय बोलू ?

झालं तुझं बोलून... जे काही.. ज्याला बोलणं चालू आहे म्हणतेस ते... झालं की सांग..

तोपर्यंत 'मौनीबाबा' होऊन बसतो मीपण...

हं... खरंच संवाद निर्माण व्हायला... खरंच उघडपणे बोलण्याचीच गरज असते का रे?

आता बघ नं... म्हणजे मला आत्ता या ढगाळलेल्या उदास वातावरणात कोणाशीतरी बोललं की बरं वाटेल हे समजून घेऊन... अगदी मी नं सांगताही.. आलासच नं हातातलं काम लवकर संपवून.

अशा वेळी छान गरम गरम वाफाळत्या coffee चा... तुझं माझं चित्र असलेला मग मला हवा असतो,

माझ्या आवडत्या खिडकीतून बाहेरचं सगळं निरखत बसायचं असतं मला...

हे सगळं सांगावं लागतं का तुला?

संवादाविनाही... हा संवादच असतो ना आपल्यातला?

संवाद काही दोन व्यक्तीतच असावा असंही नाही रे..

आता हेच बघ नं...

ही खिडकीतून दिसणारी झाडं बोलत असतात माझ्याशी.. सुखदुःखं share करतो आम्ही.

पाऊस कमी झाला.. पाणी नाही मिळालं.. नवी पानं फुटताहेत.. कळी येतेय दोन पानांमधून डोकावणारी..

कळीचं फूल होतय.. हळूहळू उमलणाऱ्या पाकळ्या.. हसत असतात लांबून माझ्याकडे पाहून... माझंही मन आनंदलं.. की झाडांची पानंही सळसळतात.. वाऱ्याबरोबर त्याच्या फांद्या हलत रहातात..

हाही संवादच असतो आमच्यातला.

जन्माला आलेलं नवं बाळ... हळूहळू डोळे किलकिले करुन बघतं... पहिल्यांदाच जग पहाताना.. आपण नक्की कुठे आलो आहोत या संभ्रमात असतं. नि माझे निळे कपडे hospital चं नाव लिहिलेले पाहिले... की उमजतं त्यालाही... आलो... या माणसांच्या दुनियेत आलो...

आणि मग झोपेतही.. लोक म्हणू देत देवी हसवत असते.. पण माझं पहिलं दर्शन आठवूनही एखादं हसू असणार त्यात...

राऊंडच्यावेळी ते हसतं नं... तेव्हा एक मूक संवाद चालतो आमचाही...

बराचवेळ घराबाहेर राहून परत येते... तेव्हा घराचं दार उघडल्याक्षणी... घर आनंदानं स्वागत करताना भासतं मला..

जगातली सगळयात cozy जागा असते ती.. माझं घर... घराच्या चार भिंतीच नव्हे.. तर घरातली माणसं.. माझं स्वयंपाकघर... माझ्या खिडकीतून दिसणारा चाफा... सारंच...

तेव्हाही एक छानसा संवाद असतो चालू..

झाडांवर येऊन बसणारे अनेक पक्षी.. पोपट.. कावळे चिवचिवणाऱ्या चिमण्या... मॅकपायचं एक जोडपंसुद्धा...

संवाद असतो तिथेही...

आणि हसू नको.. मी ही अशी शांत... एकटीच गुंग असते नं स्वतःत... तेव्हा माझाच माझ्यातल्या 'मी' बरोबर संवाद सुरु असतो माझा...

किती बोलायचं असतं ठाऊक आहे?

कोणकोण भेटलं.. खरं म्हणजे समोरच्यानं बोअर केलं म्हणून पळून जावंसं वाटत होतं.. समोरच्यानं त्रास दिलाय.. पुन्हा पुन्हा... तेच तेच प्रश्न विचारुन पेशंटनं भंडावून सोडलं असताना... नाकावर चांगले दोन ठोसे द्यावेत.. असं मनापासून वाटत असनादेखील... अगदी professional... तोंडभर हसू दाखवत कसं सहन करत रहावं लागलं होतं..

परदेशी पिल्लाची आठवण येत होती... याक्षणी आत्ता भेटावसं वाटत होतं... तरीही पापण्याआडचा पाऊस कसा थोपवून धरला होता...

मस्त गाणं  ऐकायला महेफिलीत सामील व्हायचं होतं.. पण कसं जमलच नाही... एक सुंदर मेडिकल case मिळाली.. मी diagnose केली हा आनंंद.. पण ती पेशंटची काही दिवसांचीच सोबती आहे हे सांगण्याच्या प्रसंग कसा शिताफीने सोपा करुन टाकला...

सारा मनाचा मनाशी संवाद...

हा फार महत्त्वाचा असतो नं...

जे दुसऱ्याला सांगता येणार नाही... सांगून उपयोग नाही... पण सांगितल्याखेरीज रहावत नाही.. अशा कितीतरी गोष्टी असतात रे...

त्या या संवादातून साधतात..

ओ साहेब...

काहीतरी बोला की...

मी आपली एकटीच बडबडतेय...

बये... जरा शांत रहा ना.. माझंही बोलणं चाललय ना माझ्यातल्या' मी' बरोबर...

🤔🤔🤔

हं...

आता मौनीबाबा होण्याची...

माझी पाळी आहे तर...

फक्त कुणीतरी सांगा बाई...

दोन मौनीबाबा... एकमेकांशी कसे बोलतात?

😜😜😜😜

## यशोधरा...

शुद्धोधनपुत्र...

सिद्धार्थ गौतम,

मी यशोधरा...

तुमची पत्नी... आता गतकालातील.. असं म्हणणंच योग्य ठरेल. कारण सर्वसंगपरित्याग करुन आत्मज्ञान अन् सिद्धीप्राप्तीकरता ज्या क्षणी रात्रीच्या अंधारात पदरात एक मूल टाकून तुम्ही उंबरठा ओलांडून गेलात, त्याच क्षणी माझं आणि तुमचं पती-पत्नी हे नातं क्षणार्धात संपलं होतं. लौकिकार्थानं आणि तुमच्या मनातही..

पण मी मात्र पत्नी राहिले नसूनही स्नुषा आणि माता हे पद आणि नातं सांभाळत राहिले...

इतर सर्वसामान्य स्त्रियांप्रमाणे मी राहूलचं बालपण त्याच्या बाललीला यांचा आनंद उपभोगला... तरीही प्रत्येक क्षणी माझ्या वेदनेची किनार छळत राहिली.

माझ्या श्वशुरांच्या निधनसमयी आलात... माझ्या श्वशुरांच्या असं म्हणतेय.. कारण ते तुमचे वडील असले तरी ते नातं तुम्ही आता संपवून टाकलं होतं... जे मी सासरे म्हणून अजूनही जपून होते.

आपली भेट होण्याकरता मी आपणास भेटण्यास यावं हे मला रुचत नव्हतं. कारण बारा वर्षांच्या तपस्येनंतर तुम्हाला ज्ञानप्राप्तीही झाली होती नि देवत्वही..

माझी पत्नीची भूमिका संपून एक तप लोटलं होतं. नि नात्यानं मी तुमची भक्त होते..

भक्तानं देवाच्या दर्शनाची आस धरुन त्याच्याकडे जाणं यापेक्षा देवानंच भक्ताच्या भेटीस यावं हा भक्ताचा सन्मान होताच आणि भक्ताच्या भक्तीची सत्वपरीक्षा सफल झाल्याची पावती होती. आणि म्हणूनच ज्या ठिकाणाहून मला तुम्ही सोडून गेलात त्याच ठिकाणी पुन्हा तुमचे दर्शन घडावे हीच इच्छा मनी होती.

आणि ती पूर्णही झाली.

तुमच्याप्रमाणे मी कुणी असामान्य नव्हते.. तरीही आपल्या बौद्ध धर्माचे आणि अर्थात आपलेही शिष्यत्व पत्करुन आणि त्यासाठी काम करुन माझ्या आयुष्याचे सार्थक झालेच.

पण तरीही एक स्त्री म्हणून झालेल्या आत्मसन्मानाचा अवमान टाळता आला असता हा विचार राहिलाच मागे..

भगवन्..

तुम्ही असं जाताना...

मला सांगून जायला हवं होतंत...

खरंच...

सांगून जायला हवं होतं.

असं नाही वाटत तुम्हाला ?

आताही?????

मला तुम्हांला पुढचा प्रश्न विचारायचा होता...

ज्या ज्ञानप्राप्तीसाठी तुम्ही जंगलात राहिलात बारा वर्षं... ती तुम्हाला इथे राहूनही प्राप्त झाली नसती? आणि ती मिळाल्यानंतरही पुन्हा इथेच यावे लागले...

भगवान ,

याही प्रश्नाचे उत्तर नव्हते त्याक्षणी तुमच्याकडे..

एक दिवसाच्या बालकाला पिता म्हणजे काय हे कळण्याआधीच सोडून गेलात तुम्ही.

आज बारा वर्षाच्या या पुत्राला काय देणार आहात तुम्ही याचं उत्तर मात्र कसं क्षणार्धात दिलंत...

तुमच्या हातातील भिक्षापात्र त्याच्या हाती सोपवलं... कारण त्या क्षणी देण्यायोग्य तीच एक गोष्ट होती तुमच्याकडे.

किती सहजपणे त्याच्या कळत्या नकळत्या वयात अनुयायी करुन घेतलंत त्यालाही. शिवाय मलाही भिक्षुणी होण्याची विनंती...

कदाचित् पूर्वी झालेल्या अन्यायामुळे मी ते नाकारलेही असते अशी शंकाही आली नाही तुम्हाला.

माझ्या पातिव्रत्यावर आणि क्षात्रधर्मावर आता मात्र पूर्ण विश्वास होता.

आणि मीही त्याचे पालन केले.

त्या तुमच्या स्त्री अनुयायांमध्ये मी आणि गौतमीदेवी कधी मिसळून गेलो हे कोणाला कळलेही नाही...

यशोधरा एक राजकन्या आणि राजस्नुषा होती. बुद्धिमान होती पतिव्रता होती. पतीच्या माघारी सर्व राजभोगांचा राजवस्त्रांचा अलंकारांचा त्याग करुन संन्याशिणीचे जीवन जगत असतानाही मातेचे कर्तव्य विसरली नव्हती.

लोक म्हणतात... त्यानंतर कधीच यशोधरादेवींचे वेगळे दर्शन झाले नाही.. त्यांचे उर्वरित आयुष्य आणि शेवट याबद्दल कोणालाच काही सांगता आले नाही.

स्वतःच्या 'स्व' ला, अहंकाराला तीलांजली दिली. ती भगवान बुद्धांची पत्नी होती याचा तिलाच काय इतर अनुयायांनाही विसर पडावा इतकी ती त्यांच्यात मिसळून गेली.

पुन्हा एकदा क्षत्रीयत्व सिद्ध करुनही

एक पतिव्रता..

संन्याशिण म्हणूनच जगली...



# रुक्मिणी

मी रुक्मिणी..

राज्ञी.. भगवान श्रीकृष्णाची स्वामिनी... हृदयसम्राज्ञी..

राज्ञीपद निभावणं तसंही अवघडच.

ते पदरी पडणं ही नियतीची अन् दैवाची योजना.

एकदा मला.. रुक्मिणीला विचारलंच श्रीकृष्णानं... राधेचा तुला कधी हेवा नाही का गं वाटला?

नाही भगवन्...

प्रत्येकाच्या आयुष्यात प्रत्येकाचं प्रत्यक्षात स्थान ठरलेलं असतं. अढळपणाचं कवच घेऊन आलेलं.

रुक्मिणीला जसं राधा होता येणार नाही तसच राधा रुक्मिणी होऊ शकत नाही.

कोणी काहीही म्हणोत... पण मला तिचा कधीच हेवा नाही वाटला.

आणि राधेसाठीच्या बासरीचं नि त्या मनमोहक सुरांचं विचाराल तर...

तुमच्याशी माझे आंतरिक सूर जमले असताना द्वैत कधी उरलच नव्हतं.

तुमच्या मनी उमटणारे सूर जणु माझ्या मनी तसेही उमटतच होते. त्यासाठी वेगळ्या माध्यमाची गरज मला भासलीच नाही.

विदर्भातील राजा भीष्मकाची मी कन्या. बुद्धिमत्ता अन् सौंदर्य मला जन्मजातच बहाल केलं होतं परमेश्वरानं. बालपणापासून माझ्या मनात श्रीकृष्णाखेरीज कुणीच नव्हतं. नि म्हणूनच शिशुपालासह ठरलेला विवाह मला मान्यच नव्हता. त्यासाठीच तर स्वयंवराचा घाट घातला नि ब्राम्हणकन्या सुनंदेच्या हाती पत्र पाठवलं तुमच्यासाठी.

स्वयंवराच्या मंडपातून माझे हरण करुन नेलं तेव्हा तर आकाश ठेंगणं झालं होतं माझ्यासाठी. शिशुपालापासून सुटका झाली हे तर एक कारण होतच. पण मनाजोगता पती मिळणं हे भाग्यही माझ्या वाट्याला आलं याचा परमानंद होता.

सत्यभामा जांबुवंती आणि अन्य स्त्रियांसह

आठ पत्नींचा जरी पती असला तरीही पट्टराणी असण्याचा आनंदही होताच.

सत्यभामेच्या दारातल्या पारिजातकाची फुलं पलीकडच्या अंगणात पडली म्हणून रुसलेल्या  सत्यभामेला सवत नं मानता धाकटी बहीण मानून रुसवाही काढला होता.

द्वारकेची राणी होते मी. श्रीकृष्णासारख्या व्यक्तीचं कतृत्व आणि देवत्व... दोन्हीही सांभाळायचं होतं मला.

त्याच्या नावानं भाळावर सौभाग्यतिलक लावला तेव्हाच हे सारं ओघानं आल होतं.

असामान्य असूनही, स्वतःतल्या देवत्वाची जाणीव असूनही सामान्य माणसाप्रमाणं जीवन जगलात तुम्ही भगवन् आणि अमरत्वाचा हट्ट नं ठेवता पायाला लागलेल्या बाणानं मरणही पत्करलं माणसासारखं...

दुष्ट वृत्ती संहारासाठी आणि धर्माच्या पुनरुत्थापनासाठी महाभारत घडवून आणलत तेही स्वतः रणांगणावर जाऊनही युद्ध नं करता. अर्जुनाचं सारथ्य करुन.

मग मी ही तुमचीच पत्नी होते... न्यायाचा पाठपुरावा करणं हे माझं आद्य कर्तव्य होतं.

जनमानसात राधाकृष्ण या जोडीचं स्थान जरी वेगळं असलं तरीही जेव्हा कृष्णानं यमुनेकाठी राधेचा अखेरचा निरोप घेतला तेव्हा राधा हे पर्व संपुष्टात आलं होतं. आपल्या बाललीला नि खोड्यांनी नंद यशोदेसकट अवघ्या गोकुळवासियांचा कान्हा द्वारकेचा राणा होण्यासाठी निघाला.

रणांगणावर श्रीकृष्णाच्या दर्शनासाठी राधा पुनश्च एकवार आली होती असं म्हणतात.

माझ्या मनी जे मी योजिलं होतं ते पूर्णपणे सत्यात येऊन श्रीकृष्णाची अर्धांगिनी होण्याचं स्वप्न पुरं झालच होतं नि राज्ञीपदाचा सांभाळ करण्याचं श्रेयही आपसूकच पदरी पडलं.

हे राज्ञीपद सांभाळताना कराव्या लागणाऱ्या त्यागांपैकीच... जगानं श्रीकृष्णाबरोबर रुक्मिणीचं  नाव प्रथम नं घेता राधेचं घ्यावं हे असावं कदाचित्..

पण त्याबद्दल मी खंत नाही बाळगली कधीच...

कारण स्वयंवरात हरण करुन.. प्रत्यक्ष माझ्या भावाशी रुक्मीशी अन् माझ्या नियोजित वराशी, शिशुपालाशी युद्ध करुन मला पट्टराणीपद बहाल केलं होतं... ते माझ्या प्रेमापोटीच ना...

त्यांच्या दशपुत्रांची माता होण्याचं भाग्य माझ्या भाळीच होतं.

राधाकृष्ण नातं  हे जर प्रेमाचं प्रतिक असेल तर कृष्ण रुक्मिणी हे त्या प्रेमाच्या पूर्णत्वाचं प्रतिक आहे...

सखी... तुझ्या डोक्यात सतत काहीतरी फिरत असतं... विचारांची वादळं घोंघावत असतात बहुधा...

हं...

तरल विचारांची फुलपाखरंही उडत असतात... त्यांचे रंगीबेरंगी पंख पसरून..

कधी काजवे लुकलुकतात...

अंधाऱ्या वाटांवरही इतकासा का होईना... पण प्रकाश देतात... प्रत्येकवेळी लख्ख सूर्यप्रकाशच लागतो असंही नसतं नं...

काही काही माणसंही सतत विहरत असतात विचारांमधे... कुणी तर अगदी घरच करून रहातात मनात.. मस्त पहुडतात देखील...

अशी घर करणारी माणसं.. आताशा कमीच होत चालतीत.. म्हणजे अभावानंच सापडतात सखी...

मला नाही वाटत असं...

अजूनही मला भेटतात ना..

. नवीही आणि जुनीही .. भेटतात पुन्हा पुन्हा नव्याने...

वेगवेगळे पदर उलगडत जातात त्यांचे... तलम.. पारदर्शक

स्वभावही कळतात... नव्याने...

मला वाटतं मनात

एक मोठा canvas च असतो, पेंटब्रश सकट...

हं... पेन्सिल पण असते..

कधीकधी नुसती स्केचेस..

कधीकधी रंगीत असतात चित्र ...

दोन्हीही भावतात.

आयुष्य किती मोठे स्केच आहे... नाही का?

हं... म्हणून तर त्यात आपल्याला हवे तसे रंग भरता भरता किती काळ जातो कळतच नाही.

आयुष्य संपतं.. पण सारं रंगवून होत नाही.

भरावेत कधी झाडांचे गर्द हिरवे रंग..

पालवीचे पोपटी कधी तांबुस लाल रंग...

आकाशाचे लक्षलक्ष रंग...

उगवतीचे.. मावळतीचे शतरंग...

नावही नं देता येण्यासारखे.. आगणित रंग...

निरभ्र आकाराचे नितळ निळे रंग..

मेघांनी ओथंबलेल्या आकाशाचे घनशामल  रंग...

या रंगांनी आयुष्य किती तजेलदार नि हवंहवंसं होतं नाही?

कधीकधी काळा रंगही भावतो मनाला...

सारं कसं उठून दिसतं त्यावर.. काळया चंद्रकळेवर लावलेली शुभ्र खडी पाहून पौर्णिमेच्या  चांदणरातीची आठवण होत रहाते...

अंधाऱ्या रात्रीच्या काळया रंगाचं... काळोखाचं  भय नाही वाटत...

उद्याच्या उजळ पहाटेची तयारी सुरु असते तेव्हा ...

अंधाऱ्या नाट्यगृहात तिसऱ्या घंटेची वाट पहात असणारे कलाकार जसे पडदा उघडण्याची वाट पहात असतात.. तशीच वाट पहात असणार सूर्य देखील.. क्षितिजाच्या पडद्याआड.

आकाशात तारे वावरत असतात...

सोबत वाटते त्यांचीही पण हाती हात नसतो त्यांचा. आणि तरीही...

अंधारात... साथीला आहेत असं वाटत रहातं... नि मग काळोखाची भीतीही नाही वाटत...

काळा रंगही मग आपलासा वाटू लागतो.

या साऱ्या रंगांनी व्यापलेलं आयुष्य...

जगावसं वाटतं...

खूप आसुसून जगावसं वाटतं...

रंगांमुळं...

की आयुष्यात रंग भरणाऱ्या..

मनात घर करुन राहिलेल्या...

माणसांमुळं??

# तानपूरा

तन तंबूरा... तार मन...

संत कबीरांनी दिलेल्या या सुंदर कल्पनेनं मनाचं अवकाश भारुन गेलं..

सारं शरीरच सुरांनी भरुन गेलं... षड्ज पंचम.. मध्यम.. निषाद... मुक्तपणे विहरु लागले.. नि मनाच्या तारा अलगद झंकारु लागल्या...

स्वरमंडलांच्या तारांना हळूवारपणे छेडताना अख्खा राग डोळयापुढं उभा रहावा... त्याच्या विविध अलंकारांसहित... किंवा सतारीच्या तारा छेडताना.. मागच्या तरफाही छेडल्या जाव्यात हळूवार स्पर्श करत... तद्वतच...

सुबक कलाकुसरीच्या अन् जणू नाभी छाती आणि कंठ... सारेच व्यापून रहाणाऱ्या स्वरांना जन्म देणाऱ्या तानपुऱ्यासारखं तन तंबूरा होणं... ही तर देवाची करामत अन् दैवाची साथ...

हे असं जगणं... स्वर होऊन जगणं... मोक्षप्राप्तीच जणू...

स्वराविष्कार...

स्वरविस्तार अन् स्वरांच्या राज्यातला मुक्त तरीही बेछूट नसलेला सहज विहार..

रागनिर्मितीचा आनंद...

मनाच्या तारा छेडत असताना आत्म्याला होणारा परमानंद...

सारच किती मनलुभावन... रोमहर्षक...

वेगवेगळया भावाविष्काराची निर्मिती ...

सप्तसुरांतून...

या विचाराबरोबरच...

मनःचक्षूपुढे आला तो... तोडी... माझा आवडता... तोडी..

भीनी भीनी भोर म्हणत सुंदर पहाट मनात जागवणारा...

कोई आन मिलावो मोहन शाम... म्हणत आर्त साद घालणारा... तोडी...

राग... रागांग... थाट...

जणू एक साम्राज्यच तोडीचं...

हर्षोन्माद... उल्हास.

.. कारुण्य... वेदना..

विषाद...

सर्वच प्रकारच्या मानवी भावभावनांना सामावणारा काचेचा लोलकच जणू...

मिया तानसेनाची ही निर्मिती... मियाँ की तोडी...

किती विविध रुपं या तोडीची...

दोन रिषभ घेणारा बहादुरी तोडी..

भूपाल तोडी, कुमारजींचा सहेली तोडी, आसावरी तोडी (कोमल रिषभ आसावरी),

आहिरी तोडी जौनपुरी तोडी, लक्ष्मी तोडी, अलि अकबर खां साहेबांचा सुहा तोडी, पं रविशंकरजींचा बैरागी तोडी, विदुषी किशोरीजींचा निरंजनी तोडी, महाराणा

जयवंत सिंग यांचा जयवंती तोडी... लाचारी तोडी... आणि शेवटी शब्दात मांडता नं येणारा... बिलासखानी तोडी... मिया तानसेनाच्या मुलानं बिलासखानानं तानसेनाच्या मृत्यूनं व्यथित होऊन गायलेला... अत्यंत आर्त... बिलासखानी तोडी...

असंख्य प्रकारांनी भावभावनांना स्वरांतून मांडणारा  सामर्थ्यशाली... तोडी..

आज या तोडीनं आपल्या साम्राज्यात सहज सामावून घेतलं.. स्वैरसंचार करु दिला... मनभरुन...

अन् तन तंबूरा तार मन... या शब्दांची अनुभूती दिली...



# पाऊस...

संध्याकाळच्या भेटीत एकदा तिनं विचारलं त्याला...

कशी आहे रे मी?

तू नं.. अगदी... पाऊस आहेस.

हे रे काय ??

नाही तर काय...

कधी येतेस टपटपणाऱ्या थेंबांनी... खट्याळपणे..

कधी वळवासारखी अचानक... येतेस.. भिजवतेस... आणि परततेस... माझ्या मनाची तयारीसुद्धा झालेली नसतानाच...

कधी रिमझिमणाऱ्या पावसासारखी... रमत... गमत.. परतण्याची मुळी घाई नसतेच तेव्हा तुला...

कधी येतेस... धुवाधार... कोसळत रहातेस.. जणू मल्हारानं आमंत्रण दिल्यासारखी... संततधार बरसत रहातेस.. स्वतः तच मग्न होऊन... धुंद होऊन.. इतकी  की... माझ्या मनात येणाऱ्या पुराची तुला पुसटशी देखील कल्पना नसते..

कधी येतेस श्रावण सरीसारखी...

जाताना मात्रं  इंद्रधनुष्याची कमान देऊन जातेस... सप्तरंगी...

कधी येतेस आणि घुटमळत रहातेस... लांबलेल्या पावसाळयासारखी...

परतताना कधी पाऊल अडखळतं तुझं.. मग एखादी छोटी सर आणतेस सोबतीला...

कधी येतेस.. अवकाळी पावसासारखी...

कामातून माझी सुटका नसते आणि तू तर पंख लावून आलेली असतेस... तुला किती काय काय  करायचं असतं आणि माझे हात मात्र बांधलेले असतात कामात...

माझा जीव अगदी मेटाकुटीला आणतेस... कितीही बांध घातले मनाला तरी तुझ्या येण्यानं... ते तू कधीच ओलांडलेले असतात... बांधाची माती पार विरघळून टाकतेस...

अन् कधी दुष्टपणानं...

येतच नाहीस.

माझ्याकडच्या दुष्काळाचं.. तुला काहीच वाटत नाही.

अगदी दुर्लभच होतेस की...

तू काहीही म्हण...

तु पाऊसच आहेस..

चिंब भिजवणारा... तनाला नि मनाला...

तू आहेस तशीच आवडतेस मला..

कारण 'तू'  'जीवनदायिनी' आहेस...

तिच्या आणि त्याच्या भावविश्वात पावसाला अनन्यसाधारण महत्त्व होतं..

हा पाऊस जणू सारं जीवनच व्यापून होता.

कुठलाच पहिला पाऊस त्यानी वाया नव्हता जाऊ दिला.

पहिली भेटही पावसातच...

लग्नाच्या आणाभाकाही पावसातच.. आणि अगदी लग्नसुद्धा त्यांच्या आवडत्या पावसातच...

विसरता नं येणारा... स्वतःपासून विलग नं करता येणार हा पाऊस...

खरंतर... 'जगले 'दोघेहीजण.. हा पाऊस..

अन् मग एक दिवस...

काळया मेघांनी ओथंबलेलं आकाश.. साऱ्या वातावरणातच भरुन ओसंडणारी एक आतुरता... अधिरता.. पावसाची लागलेली चाहूल.. अन् तिचेही डोळे भरलेले. कोणाच्या प्रतिक्षेत.. त्यातही एक आतुरता.. भेटीची अधिरता अन् जीवापाड पापण्याआड आसवं थोपवण्याचा प्रयत्न..

साऱ्यालाच नं जुमानता, सरसर सुरु होतो अचानक.. पावसाचा मारा.. रपरप..

तोही येतो.. असाच धावत धावत, घराच्या ओढीने. खरं तर.. तिच्याच...

पाऊस पडतोय गं छान... भिजायला येतेस?

चल नं पटकन..

घाईघाईत अनाहुतपणे आलेले ओठांवरचे शब्द... तिथेच विरले क्षणात... अन् भिजून गेले आसवात.. तिच्या आणि त्याच्याही..

काहीच लक्षणं  नं दाखवता अलगदपणे कॅन्सरने  कधी प्रवेश केला होता तिच्या शरीरात नि हातपाय पसरले होते साऱ्या  शरीरभर, काही पत्ताच नव्हता.

साधं पहाटे पोटात दुखण्याचं निमित्त... सोनोग्राफी.. अचानक diagnosis.. किडनीजवळ भला मोठा  mass.. कॅंन्सर...

अन् मग सारीच धावपळ. पाच सहा वर्षांचं मूल पदरात

काय नि कसं सामोरं जायचं, त्याला काही कळतच नव्हतं.

अॉपरेशन.. किमो... सारे सोपस्कार... मधली सारी धावपळ विसरुन त्याला पावसात भिजायची आठवण आली.. अन् तो खजिल झाला...

क्षणभर तीही अवाक..

असू दे रे... असं कर तू आपल्या पिल्लाला घेऊन जा. सोबत..

तशीपण आता मी किती पावसाळे असणार आहे तुझ्या सोबत?

खरी सोबत तुम्हालाच करायची आहे नं आता.. मग करा की सुरवात आत्तापासूनच.. माझ्या डोळ्यादेखत.. मी पाहीन नं डोळेभरुन तुमचं भिजणं.. नखशिकांत...

अन् माझ्यासाठी चार थेंब सोबत आणायला विसरु नकोस हं... चारच म्हणतेय मी.. कारण त्यापेक्षा जास्त तुला आणताही येणार नाहीत नि मला सोसवणारही नाहीत.. मला माहीत आहे, तुझ्या डोळयात भरुन आलेली माझ्यासाठीची आसवंच  पाऊस असणार आहे खरा..

पण आता तुलाही शिकायला हवं जगायला... माझ्याशिवाय

मग मी होईन ना जलधारा  नि बरसेन ना  तुझ्यावर...

होईन मी चांदणी अन् पाहीन नं आकाशातून..

होईनही मी दवबिंदू आणि ओघळेन नं दारावरच्या वेलावरुन..

असेलही गंध तिचा मला बिलगलेला..

पण तू असा हरुन नको नं जाऊ... मला निरोप नाही घेता यायचा.. अडकून राहील जीव इथेच

आता तुलाच सावरायला हवं. नि मलाही..

मला नाही रे जायचं इतक्यात.. अजून कुठे सुरवात होती साऱ्याची.. हे सारं असं अर्धवट टाकून.. अर्धवटच भोगून जावं लागेलसं स्वप्नातही नव्हतं वाटलं कधी.

आता मलाही सारं लवकरच आवरायला हवं.. वेळ फारच थोडा आहे.

ए  ऐक नं...

आपण एक करुया का? हा कदाचित् शेवटचा पाऊस आपण एकत्र भिजूया????,

तसापण आता काय फरक पडणार आहे ? अजून काही क्षण कमी होतील या सरत्या आयुष्याचे..

पण घेऊन जाईन ना मी हे तुझे माझे.. पावसाळी एकत्र क्षण.. तेच धीर देतील मला त्या अनोळखी वाटेवर जाताना.. तू नसतानाही साथ करतील मला. मग भीती नाही वाटायची..

तशी मी आहे रे शूर.. पण आता..

नको... नको ना रे म्हणू.

मला थोडंतरी 'जगायच'य  तुझ्याबरोबर...

हा पाऊस नं खरा कोणाला कळलाच नाही..

त्याचं येणं, त्याचं रमणं नि परतणं.. नाहीच समजलं कोणाला.

ऋतूचं निमित्त करुन येतो.. नि कोसळतो बापडा...

पण तसा वावरत असतोच की...

कोणाच्या न् कोणाच्या पापणीआड...

मग या बाहेरच्या पावसात भिजू ना रे  एकदा...

चल राणी... Done...

आपण दोघंही थोडं जगूया.. थोडं भिजूया...

पावसाच्या सरी पडतील न माथ्यावर.. ओघळतील गालांवरुनही... आणि मग आपल्यालाही कळणार नाही... हा खराखुरा पाऊस की डोळयातला पाऊस

पुढचे सारे पावसाळे.. मीही जगेन याच क्षणांवर..

आणि मग...

तिच्या  फिकुटलेल्या चेहेऱ्यावर आकाशभराचा आनंद.. नि पाणावलेल्या डोळयांतून निखळलेले दोन थेंब... पावसाचे..

त्याच्या डोळयात... महासागर...

## पाऊस ... पुनः पुनः

शब्दांचा पाऊस मनभर रिमझिमत होता नि त्यात हे असं आकाश काळया मेघांनी झाकोळून गेलेलं...

या मनातल्या पावसाच्या वाटा मात्रं ओठाकडे वळवलेल्या..

डोळयातून झरायची परवानगी नाकारलेली..

अगदी कायमचीच..

हं.. फारतर उसळायला बंदी नाही...

हे काळे सावळे मेघ मात्र स्वतंत्र...

मनमुक्त बरसावं ... कधी रुणझुणत्या पावलांनी झिरमिरावं... नाहीतर उन्मत्त सरींनी संततधार कोसळत रहावं...

बेबंद... बेधुंद...

मी मात्र अनिमिष

नेत्रांनी पहात रहाते त्याची विविध रुपं...

एक मात्र खरं... याचं अस्तित्व मात्रं नि

सर्गानेच मर्यादा घालून दिलेलं... वर्षातले अवघे चार महिने...

बाकी बरसलाच तर त्याला 'अवकाळी'  म्हणून दूषणं..

जास्तच कोसळला तर पूर आणण्याचं पाप माथी..

अन् कंटाळा केला पडायचा... तर दुष्काळाच्या अपराधाचा धनी...

मग या अशा आयुष्याचं ओझं आयुष्यभर पेलत राहून तारेवरची कसरत करण्यापरीस हा माझ्या मनातला शब्दांचा पाऊस भाग्यवानच की...

तसा तोही वावरतोच की विविध अलंकार लेवून उपमा नि उत्प्रेक्षांचे...

लघु.. गुरुच्या लिपीत अक्षरगणवृत्त  किंवा मात्रा वृत्ताच्या रुपात..

मंदाक्रांता असो वा शार्दुलविक्रीडित...

वसंततिलक असो... वा भुजंगप्रयात..

१९ मात्रांची मेनका वा २१ मात्रांची मंजुघोषा...

अभंग, दिंडी, आर्या साकी, ओवी...

कविता... गजल.. किती किती रुपात...

केवळ १२ स्वर आणि ३६ व्यंजनांच्या सहाय्यानं एखादा कालिदास मेघदूतासारखं किंवा एखादा गदिमा गीतरामायणासारखं महाकाव्य निर्माण करतो...

त्यांच्याही मनातल्या शब्दांच्या पावसाचंच हे दृश्य स्वरुप...

अक्षरांची ही 'अक्षर' वाङ्मय निर्मितीची क्षमता, ही सृजनता हेही या शब्द - पावसाचच वरदान...

तिन्ही त्रिकाळ नवनव्या धुमारीसह बरसत रहाणारा, नवनवीन वस्त्र लेवून येणारा... हा पाऊस... शब्दांचा..

खरंच...

अंतर्बाह्य ओला करणारा, तनमनास रिझवणारा शेवटी पाऊसच...

मग तो वरुणराजाचा असो वा... शब्दांचा...

मनभर रिमझिमणारा.. वा...

धुवाधार कोसळणारा...

शेवटी... पाऊसच...

## परिभाषा ...फुलांची

ए... कुठे आहेस?

लोकलच्या गर्दीत... कसाबसा उभा आहे...

wrong... एकदम गलत...

तुम तो मेरे 'खयालों'में हो..

wrong... ये भी गलत...

मैं तो तुम्हारी ठुमरीमें हूँ...

खयाल तो तुम गाती नहीं... 🤪

हे भगवान...

बरं... ते असू दे... एक सेल्फी पाठव ना... आत्ताच्या आत्ता पहायचय...

ए बाबा.. गर्दीत शांत उभा रहा ना...

गुलाब पाठवतेय...

🤔🤔

परत का पाठवलास?

मी गुलाब नव्हता मागितला... म्हणून परत पाठवला...

😂

हे भगवान...

नेमकी कुठल्या देवाची आठवण काढतेस गं ?

प्रसंगानुसार...

जेव्हा जो उपयोगी पडेल... त्याची.

आत्ता... श्रीकृष्णाची..

कारण असल्या खोड्या काढणं त्यालाच माहीत होतं... 🤪

तू पण ना अशी आहेस...

तूपण ना अस्सा आहेस...

पण खरं सांगू ?

ही रंगांची आणि फुलांची परिभाषा किती अनोखी असते नं.

अर्धोन्मिलित कळया... त्यांचे रंग... त्यांच्या पाकळया नि पानांवरचे दवबिंदू...

सगळं कसं सुकोमल... अधिरं नि गहिरं असतं नं...

नं बोलता... नं उच्चारता सांगण्याची... नि उमजण्याची ती एक अनोखी... अंहं...

अनोळखी नाही रे...

ती चिरपरिचित... अत्यंत लाघवी परिभाषा असते.

त्यांचे सुवास... मन मोहूनही टाकतात नि भरूनही..

त्यांच्या पाकळयांचे विविध आकार.. पानांची मांडणी.. त्यांचे रंग.. लालसर लुसलुशीत कोवळी पालवी... हिरव्या पानात लपलेल्या लाजऱ्या कळया..

किती मोहक असतात नं...

हं.. पण हातात घ्यायला जावं तर काटा कधी घात करेल सांगता नाही येत.

त्यांच्या संरक्षणासाठी देवनिर्मित आयुध आहे ते.

लक्षातही नं येता टोचणारं...

'या' हातीचा गुलाब 'त्या' हाती जातो तेव्हा नुसता नाही जात..

याचे स्पर्श.. भावना.. अन् सुगंध देखील.. या हातातून पोचतो...

त्याच्यापर्यंत...

ते हृदयाशी विसावतं नि विलगताना.. मनातून खंतावतं देखील..

कोमेजतं... विरहानं..

फुलपाखरु देखील हळूवार होतं त्यावर बसताना.

मधुरस शोषतानाही ईजा होऊ नये याची काळजी घेतं.

सारं सुचण्याचं कारण...

तू पाठवलेला..

गुलाब...

माझा आवडता... नि तुझादेखील...

पोचली मलाही... तुझी अबोल... बोलकी भाषा...

स्पर्श... त्यांच्या सुवासासकट...

# रोजनिशी

माझ्या रोजनिशीची काही पानं हरवलीत... शोधतेय मी कधीची...

एकेक माणूस... एकेक पान होतं...

म्हणजे पानं आहेत जागेवरच... त्यावरची माणसं गायब...

पुसटलेल्या खुणासुद्धा नाहीत... अस्तित्व तर शोधू कसं त्यांचं... कागदावरचं ?

कितीतरी पानात सामावलेले माझे दादा...

कधीकधी खूप आठवण येते... डोळे इतके पाणावतात की पुढचं काही दिसतच नाही, म्हणजे असूनसुद्धा नं दिसणं किती वाईट असतं नं?

किती गंमत असते नाही.. नसलेलं दिसतं... मनःचक्षूना...

आणि हे सारे धागे जिवंत करण्याचं सामर्थ्य असतं त्या रोजनिशीच्या पानात... आणि म्हणूनच शोधतेय... ती हरवलेली पानं...

रोजनिशी...

रोज रात्री निद्रादेवीच्या आधीन होण्याआधी स्वतःच्या वागण्याचं... दिवसभराच्या आपल्या बऱ्या वाईट कृतींचं अवलोकन..

छानशा गोष्टींची नोंद... पुढेमागे हीच आठवणींची मोरपिसं... हळूवार गालावरुन फिरवताना.. ते क्षण जसेच्या तसे... आपल्याच शब्दात... आपल्याच पद्धतीनं पुन्हा एकदा जगण्याची... नामी संधी...

रोजच्या आयुष्यातही... दैनंदिन घडामोडीहून वेगळे काही घडावे हे अपेक्षित असते... नि ते घडले... की जगण्यातला आनंद दुणावतो...

नाविन्य हवं असतं आपल्याला.

आयुष्याचं पुस्तक कसं भरगच्च भरलेलं असावं... घडामोडींनी... माणसांनी... विचारांनी आणि कृतींनी..

नुसतं कॅलेंडरचं पान बदलणं... हे नव्या दिवसाचं लक्षण नसतं..

रोज उगवणारा सूर्य जरी तोच असला तरी मावळेपर्यंत कितीतरी नव्या अनुभवांनी समृद्ध होऊन गेलेला असतो...

मग आपणतर चालती बोलती माणसं..

या नव्या पानावरच्या नव्या गोष्टी आपणच लिहायच्या.. आपल्या मनासारख्या...

कॅलेंडरवरच्या तारखासुद्धा, ..

repeat होतातच की कधीकधी.. वारांसकट...

आपल्या आयुष्याचं पान मात्र असतं करकरीत... नवं कोरं... रोजच्या रोज...

. ते भरुन टाकायचं... अगदी समाससुद्धा नाही सोडायचा रिकामा...

प्रत्येक वेळी पुढचं पान उलटतानाची उत्सुकता... नव्या दिवसाच्या पहाटेइतकीच प्रसन्न हवी... उत्कट हवी..

जाळीदार पिंपळपानं जीवापाड जपतो ना... तशा आठवणी जपलेल्या असतात... या रोजनिशीत...

एखादे दिवशी काहीच घडत नाही नि.. पान तसच कोरं रहातं...

निरिच्छ मनानं पुढं केलेली वाटचाल... नकोशा..

टाळलेल्या आठवणींचे संदर्भ... पुसटलेल्या दिवसांच्या पाऊलखुणा.. सगळं कसं गुण्यागोविंदानं नांदत असतं त्या एवढ्याशा वहीत..

पहिलं पान... मोठ्या उत्साहात लिहिलेलं असतं.. सजवलेलं असतं... कितीतरी गोष्टींनी लगडलेलं असतं...

शेवटचं पान...

कदाचित् कोरं...

कदाचित् का... निश्चितच...

कोरंच रहाणार...

कारण... आपली रोजनिशी आपल्याच लेखणीतून उमटते...

कोरं पान... याचाच अर्थ.. शेवट...

मग मधली पानं...

कधीच रिकामी रहाता कामा नयेत...

त्या दिवशी आपण मनानं जिवंत नसतो असं वाटतं मला...

अशी कितीक मरणं...

जगता जगता मरणं...

विचारांचं थांबणं... अडखळणं... शेवाळं साचतं त्यावर..

आयुष्य कसं आसुसून जगायला हवं...

आणि म्हणूनच कुठलच पान कोरं नं सोडता...

'जगायला' हवं..

रोजनिशीत देखील...

# पुस्तक ...आयुष्याचं

पुस्तक आयुष्याचं...

पानं कोरी घेऊन जन्माला येतं...

आपल्या हातच्या लेखणीनं..

हळूहळू भरत जातं...

काळ्यावर गोरं..

की गोऱ्यावर काळं..

कोणीतरी रीती करतं

नकळतच ओंजळ

काही पानं उलगडतात..

काही चुरगळतात..

काही उजळतात..

अन् काही आपणच..

मिटवून टाकतो... घट्ट..

चिकटवून टाकतो... एकादाही झरोका नं ठेवता.. घर बंद करावं तसं...

कोवळे किरण आत प्रवेशू पहातात...

मनाच्या गाभाऱ्यात

थेट घुसू पहातात...

उघड्या मनानं स्वीकारावं तेही..

कधीकधी...

त्यातच सापडतो खराखुरा धागा...

बांधून टाकतो... रेशमी वीण घालतो...

नि नं दिसणारी पण भावणारी..

नाती निर्माण करतो...

आतले सूर.. झंकारत रहातात.. सहस्त्र सतारी.. त्यांच्या तरफांसकट... हळूवार.. कोवळे सूर छेडत रहातात मनाला.. आतून स्पर्श करत रहातात...

अन् मग नवं गीत निर्माण होतं ना... शब्दांना फुटणारे नवे धुमारे झेलत...

नव्या कल्पना.. नवी स्वप्नं...

सोनेरी उत्तुंग... गुलाबी रेशमी...

वेढून टाकत रहातात, .. सर्वांगाला... अन् आतल्या... मनालाही...

पुस्तकाची पानं... आता रंगीत होऊ लागतात... सजू लागतात...

पानांच्या सोनेरी किनारी

दुरुनही दिसू लागतात.. चकचकीत.. स्वच्छ..

नितांत सुंदर.. देखण्या क्षणांची नक्षी सुबकतेने सजू लागते.. कर्नाटकी कशिदांसारखी..

आखीव रेखीव मधे एकदाही हात नं उचलता अखंड रेखिली जाणारी..

त्यावर... मग कोवळे.. बोबडे बोल उमटू लागतात...

इवलेसे हात मागून येऊन गळयाभोवती पडतात.. अन् नं मागता  मिळणाऱ्या सुखाच्या ओंजळी भरभरुन उधळत रहातात..

हे क्षण.. पकडून ठेवायला लागतात...

पिल्लं पंखात बळ आलं की उडणार... हे सत्य गृहीत धरुन...

ध्येयांचे हिमालय आताच चढायचे असतात... नं थकता... नव्या उत्साहात...

मग हरखून जाण्याच्या संधी येतात... आपल्या पूर्वसुकृतानुसार...

मजा घ्यायची त्या क्षणांची..

पुन्हा आयुष्याच्या उत्तरार्धात.. ही पानं पुन्हा पुन्हा चाळायची...

कधी मन हेलावणारे क्षण.. कधी.. उन्मळून टाकणारे क्षण येतात.. वादळं येतात...

साऱ्याला  खंबीरपणे सामोरं जायचं नि त्यांच्या पायऱ्या करुन.. पुढे निघून जायचं...

सगळी पानं घट्ट चिकटवून...

नवी पानं उलटायला...

आता पुस्तकाची पानं जुनी होऊन पिवळी पडू लागतात.. आपल्या केसांच्या महिरपी चंदेरी होऊ लागतात...

तरी अलगद... उलटत रहायची पानं... नं फाटू देता...

घालायचं त्याना पुन्हा एकवार सोनेरी चमकदार वेष्टण... आपल्यालाच नवं भासू लागतं... आपलच पुस्तक...

अन् मग..

एखाद्या नव्या वर्षाच्या पहाटे... उघडून बसायचं... नि सारं एकदा चाळून पहायचं..

हळूवारपणे पण तटस्थतेनं...

हरवलेली नाती.. अन् नव्या नात्यांची भर...

साऱ्यांचा ताळमेळ जुळवायचा...

नि सिध्द व्हायचं नव्या पानावर... नवी.. सोनेरी अक्षरं लिहायला...

# अर्थ स्वप्नांचे

माझ्या स्वप्नाचा मी अर्थ शोधतेय.. कर ना मदत थोडीशी...

अगं, मला कसं कळेल तुला काय दिसलं स्वप्नात ?

हे बरं आहे... तूच तर होतास ना बरोबर... मग दुसऱ्या कोणाला विचारु ?

म्हणजे कसं आहे नं...

मी भराऱ्या घेत कुठेही पोचले ना, तरी साऱ्याचं उत्तर तुझ्याचपाशी येऊन ठेपतं.

माझी स्वप्नं तुझ्यापासूनच तर सुरु होतात.. तुझ्याभोवतीच फिरतात... आणि...

नाही... संपत नाहीत... सत्यात उतरण्याचा प्रयत्न करतात...

म्हणूनच तर  म्हणतेय... मदत कर ना please, .

माझी बहुतेक स्वप्नं... जागेपणीच पाहिलेली असतात... अंहं... शेखचिल्ली नाही...

जाणतेपणी.. समजून उमजून..

स्वप्नांचा व्यापार करु नये नि त्यांचा बाजारही मांडू नये.

मनभर पसारा मात्र मांडावा त्यांचा... नीट... निगुतीनं सांभाळावीत आणि

जणू शिवलिंगावर अखंड अभिषेक चालतो ना कलशपात्रातून अविरत... तसं

कष्टांचं खतपाणी करावं...

सत्यात उतरणं अनिवार्य ठरवावं त्यांच्यासाठी...

मनाचे गाभारे ओसंडून वहातात मग...

सातत्य हवं नि चिकाटीही.

ध्येयपूर्तीचं समाधान.. स्वस्त नसतच कधीही...

मोल तसंही नाही करता येत त्याचं...

स्वप्नं... असतात हळुवार... तलम... उमलत्या फुलांच्या मऊशार  पाकळयांसारखी..

स्वप्नं असतात विशाल... अथांग सागरासारखी...

स्वप्नं असतात उत्तुंग... हिमालयासारखी

निवडण्याचं स्वातंत्र्य असतं प्रत्येकाला...

त्यातून निवडायचं होतं मला आज एक स्वप्न...

अन् त्याचसाठी म्हणत होते... मदत कर ना मला... त्यांचे अर्थ शोधण्यासाठी नि.. त्यांच्या परिपूर्तीसाठीही, ...

कारण माझी स्वप्नं पुरी होतच नाहीत...

तुझ्याशिवाय...

# अंतर्मुख...

तुझं प्रत्येक वाक्य मला नव्याने विचार करायला लावतं.. स्वतःच्या आत डोकावून पहायला लावतं

मी जशी आहे तशीच दिसते ?

की माझं असणं आणि दिसणं.. यात फार तफावत असते ?

आभास निर्माण करणं हा माझा स्वभाव नाही.

नितळ पारदर्शक असावं माणसानं ही आणि इतकीच अपेक्षा असते माझी... मग माझ्या स्वतःच्या बाबतीत मी वेगळी का वागेन? मला तर काहीच सिद्ध करायचं नाही नि साध्यही...

त्यामुळे असाध्य ते साध्य करण्याचा आटापिटा नाही करत मी..

कधीच...

हं योग्यायोग्यतेची जाण मला आहे. आणि अयोग्य मार्ग निवडणे माझा स्वभाव नाही... मी त्या विचारांनाही जवळपास फिरकू देत नाही..

कुणाला दुखवण्यात मला आनंद होत नाही नि तसं वागण्यात मला स्वारस्यही नाही.

पण योग्यतेच्या आणि नीतीअनितीच्या सर्व मर्यादांचा मी मनापासून आदर करते..

माझा स्वतःचा आनंद कशात आहे हे मी स्वतः ठरवते... त्याचप्रमाणे दुसऱ्याच्या आनंदासाठी काही करणं... मला पटत असो वा नसो... मला आवडतं नि ते करण्याचा माझ्या परीनं प्रयत्न करते.

छोट्या छोट्या गोष्टीत आनंद शोधणं हा माझा स्वभाव आहे. त्या गोष्टीत दुसऱ्याला आनंद वाटेलच असे नाही. ती अपेक्षाही करणं चुकीचं आहे.

साधं फूल उमलताना पहाणं.. लाजाळूची पानं मिटताना पहाणं... पक्षी उंच उंच जाताना त्यांच्या पंखांच्या हालचाली निरखणं..

आवडतं मला..

एखादं सुंदर चित्र पहाताना होणारा आनंद मला जसा होतो तसा अजून कोणाला  होईल  हा विचार पटकन येतो मनात...

मला मोहवणाऱ्या सुरात कोणालातरी वाटेकरी करुन घेणंही आवडतं मला.

आनंद ही एकट्यादुकट्यानं अनुभवण्याची गोष्ट नाहीच खरं तर...

तो वाटल्यानं वाढतो हे तर खरंच...

स्वान्तसुखाय... असा विचार क्वचितच करते मी.

माझ्या आनंदाच्या... तो उपभोगण्याच्या हट्टापायी दुसऱ्याला तो गमवावा लागू नये.. याचीतरी काळजी नक्कीच घेते मी.

माझी स्वप्नं पुरी झालेली पहाणं हा माझा सर्वात आवडीचा छंद आहे. मग ती मी स्वतः पाहिलेली असोत... वा माझ्यासाठी दुसऱ्याने..

ती पूर्ण करण्यासाठी पडणाऱ्या कष्टांची मला पर्वा नाही... ती नसावी हा मी मला घालून घेतलेला अलिखित नियम असला तरीही तो मी पाळते.

म्हणूनही असेल कदाचित् ... पण फारशी अपुरी नाहीत स्वप्नं माझी.

स्वप्नं पाहिलीही आणि पूर्ण झालेलीही पाहिली मी..

सुखी समाधानी आयुष्याचं ते एक उघड गुपीत असावं..

आहे त्यात समाधान मानावं... या विधानाला दोन बाजू आहेत.

एक.. असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी ही वृत्ती... जी मला कधीच मान्य नव्हती..

आणि.. दोन...

स्वतःच्या कष्टाने मिळालेली गोष्ट मग ती बाकीच्यांपेक्षा कमी दर्जाची असेलही कदाचित् ... पण ती स्वकष्टार्जित असल्याने मला जास्त आनंद देते. आणि याचं पुरेपूर समाधान मला मिळतं..

खरंच...

मला इतकं सारं खोलवर जाऊन विचार करायला भाग पाडलस...

पुन्हा पुन्हा असं स्वतःला पडताळून पहायला हवं...

त्रयस्थपणे... आणि तटस्थपणेसुद्धा...

स्वतःच्या झालेल्या चुका टाळण्याची... ही नामी संधी असते.

स्वतःशी प्रामाणिक असलं तरी पश्चात्तापाचे प्रसंग कमी येतात आणि आलेच तरी त्यांची दाहकता कमी असते कारण त्या गोष्टीसाठी आपण जबाबदार आहोत हे पूर्णतः माहीत असतं आपल्याला.

हे सारं... मी माझ्या नजरेनं मला पाहिल्यानंतर जाणवतय मला...

तुझ्या नजरेतली आत्ताची 'मी'.. कशी असेन कोण जाणे...

अशीच आहे ना?😜

तुझ्या एका मिस्किल.. ओठ मुडपून हसू दाबण्याच्या प्रयत्नाचा अर्थ.. मी काय समजायचा?

हे बघ... मी आहे.. ही अशी आहे... अशीच रहाणार बहुधा... 🤔

आता म्हणू नकोस...

मनुबाई... दमलात विचार करुन.. पार शिणलात...

अहो आयुष्य कसं मजेत जगावं माणसानं..

चिंतांची चिंता करु नये...

दुःखाचं दुःख करु नये... नि भांडवल तर कधीच करु नये...

या तुझ्या वागण्यानं... आणि माझ्या बरोबर 'तू' आहेस या विचारानं...

सगळच सोपं वाटायला लागतं...

खरंच...

ते असावंच तितकं सोपं...

अगदी सोप्पं...

# गीतनिर्मिती

प्रिय तू ...

माझ्या शब्दकोषातले शब्द मी जपलेत तुझ्यासाठी,

रेशीम कोष असतात ना... तसे...

वरुन दिसतीलही ओबडधोबड.. पण आतून येणारं तलम रेशीम... मऊ मुलायम असतं नं... तसंच अगदी...

तुझ्या स्वरकोषांची बरोबरी मला नाही रे करता येत...

त्यांचा आस्वाद घेणं.. अगदी मनापासून... ते मात्र साधतं मला...

असू दे ना... प्रत्येकालाच प्रतिभेचं सगळंच वरदान कसं असणार?

स्वरांचा अलगद उलगडत जाणाऱ्या लडी... आलापीतून  एखाद्या रागाचं साम्राज्य उभं करायचं काही सोपं काम नव्हे.

त्याला विविध अलंकारांनी सजवणं... शुद्ध.. कोमल... तीव्र स्वरांची चपखल मांडणी करणं...

मंद्र मध्य तार सप्तकातला तुझा सहज विहार..

विद्युल्लतेसारख्या चपळ तानांनी केलेलं  सुशोभीकरण ...

हे सगळंच अगदी पंचप्राणांनी ओवाळण्यासारखं देखणं असतं...

त्यात पार गुंतूनच जाते मी... जणु रेशीमलडी वेढून टाकतात चहूबाजूंनी...

तो मृदुमुलायम स्वरस्पर्श फार आवडतो मला..

त्या स्वरांच्या राज्यात असं विहरत राहिलं... की शब्द सुचत रहातात म्हणण्यापेक्षा... आपोआप स्फुरत रहातात.. उत्स्फुर्तपणे.. कोणत्याही बंधनाविना...

अडसर नसतात कोणतेच...

स्वर आणि शब्दांच्या मीलनातून होणाऱ्या 'गीता'ची आस असते रे मनात...

हा सोहळा मनातल्या मनात कितीदा जगते मी माहीत आहे?

पण खरं सांगू?...

स्वरकोषातल्या तुझ्या जादू. ई... सुरांपुढे कधीकधी शब्द थिटे पडतात माझे...

ती अनुभूती, ... संवेदना...

नाही मांडता येत पुरेशी... तिचा आस्वाद घेणं इतकच हाती असतं...

एखादी जागा अशी जीवघेणी असते... त्याक्षणीच जगून घ्यावं... हातात नाही पकडता येत...

पुन्हा तशीच यावी म्हटलं तरी नाही जमत...

आपल्या आयुष्यातले क्षणपण असेच असतात नं काही... ते त्या क्षणी जगून घ्यायचे...

उद्यासाठी म्हणून राखून नं ठेवता...

किंवा त्यांच्या क्षणभंगुरतेची खंत नं करता...

ते आपल्या ललाटी कुणी विष्काराची लिहिले... कोरले याचच समाधान मोठं असतं... ते असंतसं वाया नाही घालवायचं...

जगणं... अगदी खरं जगणं... ते याच क्षणात लपलेलं असतं नं...

म्हणूनच तुझा प्रत्येक सूर मी जगत असते...

माझ्या शब्दकोषांची अमानत असते ती...

कारण उधळण्यासाठी लागणारे शब्द.. सुरात भिजून आले की चिरकाल टिकतात...
त्याना अमरत्वाचं वरदान लाभतं असं वाटतं मला...

आणि म्हणूनच...

माझे शब्दकोष अविरत ओसंडून वहाण्यासाठी... तुझे स्वरकोष हवेत मला...

त्यांच्या अलंकारांसहित...

गीतनिर्मितीच्या आनंदासाठी...

दोन्हीचं रीतं होणं... हवच की...

खरं ना?

# ओंजळभर सूर

कृष्णा...

तुझे ओंजळभर सूर दे ना मला...

अगं.. वेडी की काय तू?

असे कसे देता येतील?

असं रे काय.. तुझ्याकडे कितीतरी आहेत. दे की थोडेसे मला..

अगं... कसे देऊ?

मी अन् सूर... एकच आहोत.. आम्हाला वेगळं कसं करता येईल?

मग माझ्या दृष्टीने तू अन् मीसुद्धा एकच आहोत... तरीही तुला का बरं देता येत नाहीत?

बासरी देऊ?

ती काय रे करु घेऊन ?

ती तुझ्या अधरी असते... तेव्हा तू प्राण भरतोस तिच्यात..

आत्मा असला तर शरीराची गंमत..

त्या निष्प्राण.. बासरीला घेऊन करु तरी काय?

मग... काय बरं करावं मी ?

दे ना रे ओंजळभर सूर...

मी अगदी खूप काही मागतेय का ?

राधे खूप काही मागितलं असतस तर देता आलं असतं गं..

पण ही तुझी मागणी...

उद्या तू जाशील गोकुळ सोडून...

तुझ्या या सुरांसाठी तर जीव ओवाळून टाकते मी माझा...

मग जर तुझे सूरच नसतील तर...

मी जगावं कसं ते तरी सांगून जा...

तुझ्या सुरांची मोहिनी तर जगायला भाग पाडते मला...

तू तर असणार नाहीस..

मग तुझी बासरीही नाही...

आणि तुझे सूरसुद्धा..

मी कुठे म्हणतेय ?

तू जाऊ नकोस ?

राधे तसं म्हण एकवेळ..

कृष्णा.. जाऊ नकोस...

पण माहीत आहे मला...

नं सांगता सवरताही..

तू तसं म्हणणारच नाहीस...

माझ्या वाटेत अडथळा बनणं..

हे ना तुझ्या भक्तीत बसतं.. ना प्रेमात...

तुझं मन कितीही आक्रोशत असलं.. तरीही ओठावरचं हसू टिकवून ठेवलस तू...

माझ्यासाठीच ना?

माझं पाऊल तुझ्यापायी अडखळू नये...

म्हणूनच ना ?

राधे...

तुझ्यापेक्षा तुला जास्त...

मी ओळखतो..

पूर्ण समर्पण काय असतं...

हे जगाला तुला पाहून समजेल..

तुला ठाऊक आहे..

मी आणि सूर..

वेगळे नाही करता येणार..

आणि म्हणूनच तुझी ही मागणी पूर्ण  करण्याचं कोडं.. साधंसुधं नाहीच मुळी.

माझ्याशी एकरुप होण्याचा.. तो एक सहज सोपा मार्ग आहे..

हेतुलाही अन् मलाही माहीत आहे पूर्णपणे.

चल... राधे उशीर होतोय..

आज शेवटची बासरी वाजवेन मी या यमुनेच्या  साक्षीनं...

पण... आज ती तुझ्यासाठी नाही...

माझ्यासाठी...

कारण...

यापुढे या कृष्णाची बासरी पुन्हा कधीच वाजणार नाही...

कृष्णाचे सूर राधेसाठी होते... खरंतर..

राधा म्हणजेच सूर होते आणि म्हणूनच..

माझ्यापासून ते वेगळेही करता येत नव्हते.

आज या निरोपाच्या क्षणी...

आयुष्यात पहिल्यांदा तू काही मागितलंस माझ्या कडे ते तुला नं देता जाऊ तरी गं कसा?

जग म्हणेल...

कृष्ण अपयशी ठरला.. दातृत्वात...

घे राधे...

मी माझे ओंजळभर का ?

सारेच सूर मागे ठेवून जातोय...

समजतय ना तुला?

बन्सीधर... त्याचे सूर  मागेच ठेवून जातोय..

तुझी आठवण म्हणून नेतोय.. ही बासरी...

पण तू म्हणालीस ना...

आत्म्याशिवाय शरीर... तसंच...

सुराविना ही बासरी...

फक्त एकच कर...

आता मी तुझ्याकडे मागतोय काहीतरी...

त्याला... नाही म्हणू नकोस...

सर्वसाक्षी परमेश्वराला.. मी काय रे देणार?

राधे पुढचं सगळं स्पष्ट दिसतय मला...

हे कालचक्र...

एकच वचन दे...

दातृत्वाची हार होऊ नये म्हणून आज मी तुला दिलेले..

हे माझे सूर... तेच पुन्हा एकदा उधार देशील?

दानशूर सूतपुत्र... कुंतीपुत्र म्हणून ज्याला कधीच सन्मान मिळणार नाही.. अन् जेव्हा हे जगास कळेल... तेव्हा त्याचा शेवट जवळ आलेला असेल.

त्या राधापुत्रासाठी...

हे राधे... तुझ्या स्मरणानं एकवार. फक्त एकवार मला बासरी वाजवायला.. सूर दे..

माझ्यासाठी नव्हे गं..

त्या... राधापुत्रासाठी...

परमेश्वरानं काही आपणाकडे मागावं ?

कृष्णा... का लाजवतो आहेस?

इतकीच का मी कळले तुला?

सामान्य असले... तरी तुझ्या संगतीनं मलाही

माझा स्वार्थ दूर सारणं जमू लागलय..

अन् त्या रात्री... साऱ्या आसमंतात भरुन राहिले... ते बन्सीधराचे अखेरचे सूर...

अन् परतला कृष्ण... जड मनानं आपलं देवत्व विसरुन..

त्या राधेयासाठी

राधेनं दिलेले ओंजळभर सूर... हृदयात लपवून...



# तानपुरा

प्रिय तू...

ए.. सांग ना.. पुढच्या जन्मी तुला काय रे व्हावसं वाटतं ?

खरंच असतो पुनर्जन्म ?

असलाच तर... मला तानपुरा व्हायचय.. षड्ज पंचमाच्या तारा असणारा.. सगळया छेडल्या की गंधाराला जन्म देणारा...

फार जपावं लागतं रे त्याला.. हळूवार छेडावं लागतं...

हं .. पण एकदा छान tune झाला की कसे स्वच्छ नितळ अन् सच्चे सूर उमटतात त्यातून... यत्किंचितही स्पर्श नसतो इतर कोणत्याही मद मोह मत्सराचा...

हं... आता तरी कुठे वेगळा आहेस याहून ?

तुझ्या या नितळ स्वच्छ स्वभावानच तर भारावून गेले ना मी...

एक अद्‌भुत संगीत काय असतं... ते तुझ्यामुळेच तर कळलं.

अन् त्या तारा छेडणारा कुणी असामान्य लाभला कुमारजी,

भीमण्णा प्रभाताईंसारखा... तर जीवनसाफल्य लाभलच की... तसंही किती जगलोपेक्षा कसं जगलो हेच महत्त्वाचं असतं ना...

खरंच... तेही अगदी खरं... पण मग मी काय व्हायचं ?

षड्ज... षड्ज होऊ?

अचल... तुझ्यापासून कधीच नं दुरावणारी ?

नको... त्यापेक्षा...

मध्यम हो तू...

शुद्ध मध्यम... षड्जाबरोबर, त्याच्या भावनांशी जुळणारी स्पंदनं निर्माण करत जगणारी... जीव जडवणारी..

सुरसंवादिनी...

पण मग... प्रत्येकवेळी असेन मी तुझ्याबरोबर ?

'मध्यमा'ला वर्ज केलं तर ?

मला नाही जगता येणार...

त्यापेक्षा...

षड्जच होईन... कधीच वर्ज होणार नाही तुझ्या आयुष्यातून.

किंवा असं करु... आपण नं तानपुऱ्याची जोडी होऊया...

साथीनं उभे राहू... एक छेडला तर दुसऱ्यातून स्वर उमटतील... एकाची स्पंदनं दुसऱ्याला जाणवतील

एकरुपता...

तेच हवं असतं नं शेवटी...

साथसंगत.. समर्पण... अन् एकरुपता...

ठरलं तर मग...

पक्का प्रॉमिस...

तानपुराच होऊ... दोघंही...

# मुंबई पुणे ..... हायवे



हा पुणे मुंबई express  वे मला नेहमीच फार सृजनशील वाटतो.

Headphone लावून मस्तपैकी ललत भटियार किंवा कुणाचा छानसा ललितागौरी ऐकावा.

बाकी लोक मस्त झोपलेले असतात निम्मे घोरतही असतात. ते ऐकू येऊ नये म्हणूनही हे हेडफोन येतात कामाला.

या प्रवासातले शांतपणाचे एकांतातले क्षण फार आवडतात मला आणि म्हणूनच असे तसे वाया घालवायचे नसतात.

पहाटेचं निरभ्र आकाश तितक्याच निरभ्र मनानं पहाण्याची संधी गमवायची नसते मला.

प्रत्येक प्रवासात वेगवेगळया फुलांचं नि डवरलेल्या हिरव्याकंच झाडांचं दर्शन हा एक मनमुराद उपभोगण्याचा सोहळा असतो.

फार प्रसन्न वाटतं तेव्हा.

खिडकीतून अंगावर येणारी कोवळी उन्हं सारा दिवसच सोनेरी करुन जातात.

लांबूनच डोंगरही खुणावत असतात. नव्या आव्हानाची साद ऐकू येत असते जणू.

नवं काहीतरी करावं असं कुठेतरी सतत वाटत रहातं.

आणि म्हणूनच हा रस्ताच सृजनशील वाटतो नेहेमी.

पावसात वहाणारे झरे, हिवाळ्यातले दवबिंदू, श्रावणसरींची बरसात आणि त्यामागून येणारं सप्तरंगी इंद्रधनुष्य...

रणरणत्या उन्हाची चाहूल आणि तेव्हाच अगदी एकही पान नं दिसता नुसत्या फुलांनी डवरलेला एखादा भलामोठा वृक्ष..

रस्ता तोच असतो पण प्रत्येक वेळी नवा भासतो नव्या रुपात भेटतो.

नाविन्याचा अविष्कार आणि नाविन्याची ओढ यातच तर सृजनाची बीजं पेरली जातात. मग त्यासाठीच्या परिश्रमातून कधी सुंदर शब्दशिल्पं साकार होतात कधी सुरेल संगीत निर्माण होतं. कधी कल्पनेपलीकडचं सुंदर चित्र रेखाटलं जातं.

बिनाकुंचल्यानंही रंगत रहातं नि सारं आयुष्यच रंगीत करतं.

रोजच्या रुक्ष  रुटीनमधून लाभणारे असे दुर्मिळ क्षण पकडता यायला हवेत.

म्हणजे मग परतीच्या प्रवासातला पूरीया दरवळत रहातो मनात... पुढच्या ललतच्या हाकेपर्यंत...

# पुणे मुंबई हायवे.....

पुन्हा एकदा... तोच पुणे मुंबई express highway...

उलट्या दिशेने प्रवास... परतीचा..

जाण्याची आणि येण्याची वेळ निश्चित असली की निम्मा प्रवास सुखकर होतो.

काल सकाळचा प्रवास... आज संध्याकाळचा.

सूर्याची दिशाही बदललेली अन् किरणांचं तेजही.

दाहकतेतही फरक...

एकात उत्साह... क्षितिजावरती टाचा उंच करुन आजच्या दिवशी काही नवं घडणार का... काल रात्रीत माझ्या अपरोक्ष काही नवं घडलय का.. अशा नजरेनं कुतुहलानं पहाणारा सूर्य...

अन् दुसरीकडे श्रांत क्लांत.. दिवसभराच्या कामाने थकलेला... वियोगाच्या रंगांची शाल पांघरलेला... अस्ताला जाणारा... सूर्यच...

सहा सव्वासहालाच निरोप घेतोय...

बाहेर रोड डिव्हायडरवरचे पिवळे केशरी दिवे... एका लाईनमधे शिस्तीने उभे... आणि रस्त्यावर विविध स्पीडमधे धावणाऱ्या लहानमोठ्या विविध रंगाच्या विविध आकाराच्या गाड्या तरी... ब्रेकलाईटचा रंग मात्र एकच... लाल...

मागच्याला थांबण्याची सूचना देणारा...

आपल्यालाही अशी थांबा म्हणून सिग्नल देणारे... लाल दिवे भेटत असतात नाही का वेळोवेळी.. प्रत्येकवेळी ती सूचना समजतेच असं नाही की समजूनही आपण कानाडोळा करतो ?

असो...

सकाळी ललितागौरीचा वावर होता काल...

आज... पूरिया... आर्त. आर्जवी... सखीला जाऊ नको म्हणून विनवणारा...

की  विरागी मारवा ?...

कोणात गुंतावं आज?

काळजाचा ठाव घेणारा... दोघांमधला कोमल रिषभ एकच तरीही वेगळं अस्तित्व... वेगळा लगाव...

कितीकवेळा अगदी समसमान व्यक्ती भेटतात आपल्याला. तरीही त्यांच्याबद्दलच्या भावभावना वेगवेगळया...

नाती वेगळी.. आणि त्यांच्यात गुंतण्याचे प्रकारही वेगळे...

कोणी मनात घर करुन रहातं... स्थिरावतं..

मारव्याच्या कोमल रिषभासारखं... जीवस्वर होऊन..

कोणी... पूरियाच्या कोमल रिषभासारखं.. आधार देणारं.. थोड्याशा अस्तित्वानेच बहार आणणारं...

या सगळयांचच आयुष्यात 'असणं ' देखील किती आनंददायी असतं नाही..

त्यांच्या नात्यांचे पदर मात्र नीट उलगडता यायला हवेत... गल्लत नं करता...

एकसारखेच दिसले म्हणून...

अन् शेवटी बाजी मारली.. मारव्यानं...

Expressway संपून

खडबडाटाचा रस्ताही कधी पार केला पत्ता नाही लागला...

होत होताही त्रास खाचखळग्यांचा...

आयुष्यातही होतोच नं...

पण जीवस्वर होऊन असणाऱ्या कोमल रिषभाची साथ  सारं निभावून नेईल हा विश्वास असतो... दृढ...

अन् मन पुन्हा एकदा आनंदलं., ..

प्रवास संपला होता...

आभाळभर चांदणं विखुरलं होतं...

ते गोळा करण्याचही सुचलच नाही...

अरे का काय?

दोन्ही प्रश्नांचं एकच उत्तर....

मारव्याचा जीवस्वर भेटला म्हणून...

'तू' च की... आणि आहेच कोण...

इतकं.. 'प्रिय '...



# ती....

'ती' नेमकी काय  असते?

म्हटलं तर... ती तशी फार अल्पसंतुष्ट असते.

छोट्या छोट्या गोष्टीत सुखाचे क्षण शोधत असते नि आनंदाचा सडा शिंपित असते प्राजक्त होऊन... झाड असतं स्वतःच्या दारी पण फुलं दुसऱ्याच्या दारी पडल्याचं सत्यभामेचं शल्य तिला बोचत नसतं उलट स्वतःहून दुसऱ्याला देण्याचा आनंद ती उपभोगत आसते आणि हेच तिचं असामान्यत्व सामान्य असूनही निराळं भासत रहातं.

तप्त भेगाळल्या धरेला पहिल्या पावसानं शांत करावं आणि मृद्गंध वाटत रहावं तशीच असते 'ती' ही...

श्रावणसरींनी आनंदणारी आणि इंद्रधनुष्याच्या रंगात नखशिकांत रंगून जाणारी...

खरं तर 'ती'...

पाऊस असते... विविध वेळी विविध स्वरुपात वेगवेगळ्या ढंगात...

टपटपणाऱ्या थेंबांसारखी, रिमझिमणारी तर कधी धुवाधार बरसणारी... प्रलयंकारी... जीवदायिनी अन् विनाशकारीसुद्धा..

मातृहृदयीही तीच... अभिसारिकाही तीच..

ती...

सखी असते... नं सांगताही सारच समजून घेणारी... कललं तर आधार देणारी अन् पडलं तर सावरणारी..

कधी पुढाकार घेणारी.. कधी पाठीशी रहाणारी अन् कधी खांद्याला खांदा लावून बरोबरीनं चालणारी..

तिच्या डोळयातली स्वप्नं बाजूला सारुन त्याच्यातल्या सूर्यापुढे झुकणारी...

ती असतेच... खळाळत वहाणारी नदी... बरोबर दगड धोंडेही संगतीनं नेणारी... अन् हळूहळू शांत होत... सागराशी एकरुप होणारी... स्वतःतलं सारच समर्पित करणारी..

तरीही... ती.. 'ती'च असते...

समर्पणातही

स्वतःचं स्वत्व जपणारी ... अन् ते कसब फक्त अवगत असतं तिलाच..

अन् म्हणूनच एक तरी लेक हवी..

'ति'चा वारसा पुढं नेणारी...

सृजनत्वासकट...

'ती' असली तर तो...

तिच्यातच दडलेलं तिचं अस्तित्व...

अन् तिच्याशिवाय त्याचं अपूर्णत्व...

हे सारं एकदा स्वीकारलं  की मग अर्धनारीनटेश्वरात दडलेली ती शोधणही कठीण नाही...

# गुड नाईट....

काल रात्री बहुधा कोणीतरी जबरदस्त Good night केलं वाटतं मला...

उषःकालच्या क्षितिजावरच्या लालीची  परतीची वाटसुद्धा संपून गेली होती. पहाटवारे...

दवबिंदू  हजेरी लावून मार्गस्थ झालेले.

घड्याळाचा गजरसुद्धा वाजून वाजून थकून गेला असावा... आजकाल कोंबडाही वेळीअवेळीच आरवत असतो.. सवडीने... आरामात... या लोकांच्या उशीरापर्यंत जागण्याच्या सवयीची लागण त्यालाही झालीय की उशीरापर्यंतच्या कोलाहलाने त्याचीही झोप पुरी होत नाही कोण जाणे...

पण टाकणं टाकल्यासारखा तोही एकदा आरवण्याचा प्रयत्न करुन शांत झाल्याची पुसटशी जाणीव झालेली थोडीफार आठवत होती.

पहाटस्वप्नानं येणारी जाग... वगैरे वगैरे... अहं...

काही स्कोपच नव्हता...

Good night चा अंमल अजूनही तसाच.

डोळे किलकिले करुन पहाण्याचे तीन चार  असफल प्रयत्न आता मोडीत काढायलाच हवे होते...

ती कवितांची जाळयातून बाहेर पडण्याची धडपड.. शब्दांचे पसारे आवरणं... प्रभाती नभी रंगणारे सूर... वगैरे सगळं बाजूला सारुन मन एका क्षणी इतक्या मोठ्यानं ओरडलं... ऊठ नं आता...

की दचकून पटकन उठून बसले.

आता कुणी  तरी जबरदस्त Good morning करायलाच हवं होतं  त्या जबरदस्त good night ला उतारा म्हणून...

घरात इकडं तिकडं पाहिलं... कोणाची जाग दिसेना...

आपापल्या कामाला लागले असावेत...

Whatsapp उघडलं... एकाच वेळी मासे जन्मल्यासारखे दोन तीनशे मेसेज पटापट पटापट... अगदी वायुवेगाने पळत होते...

कितीतरी चित्रं... अन कायकाय...

सगळं दुर्लक्षित करुन उठणं तसं कठीणच वाटत होतं... पण... हं...

असो...

नेहेमी येणाऱ्या अमेरिकेतील मुलाच्या good morning  फोननं सुद्धा आज दगाच दिला.. त्यानंही आज Good night च म्हटलं चुकून...

पुन्हा.... देवा रे देवा.. सगळयांनी उठू नं देण्याचा चंगच बांधलाय की काय आज...

कोणी करु नको... असं म्हटलं की तेच करावसं वाटतं बऱ्याचदा....

या संकल्पनेनं मात्र आता हात दिला...

सकाळी सकाळी कोणी goodnight केल हे झुगारुन उठून कामाला लागले खरी...

पण तरीही....

रात्री इतकं powerful GOOD NIGHT कोणी केलं... याचा मात्र शोध घ्यायलाच हवा...

असावा emergency phone call नंबर list मधे...

सर्वात महत्त्वाचा म्हणून ...

आजकाल दुरापास्त झालेली... शांत झोप...

पटकन मनातल्या मनात त्या अज्ञात., ..

जबरदस्त GOOD NIGHT वाल्या  महाभागाचे आभार मानून टाकले... न्... काय...

पुन्हा एकदा रहाटगाडगं सुरु...

तीही गरजेचीच गोष्ट ...

## बाकीबाब

आज बाकीबाब असते तर एकशे अठरा वर्षांचे झाले असते...

हे झालं त्यांचं biological age.

त्यांच्या कवितांतून तर ते 'असताना 'जसे चिरतरुण होते तसेच आजही आहेत कारण त्यांच्या कलाकृतींना अमरत्वाचे आणि चिरतारुण्याचे वरदान आहे.

ज्ञानोबा तुकारामांइतकेच गोमंतकीय लोकसंस्कृती आणि युरोपातील लॅटीन तसेच स्पॅनिश संस्कृतीचे त्यांच्या कवितेवर संस्कार असल्याने त्यात अनंत विविधता आहे.

निसर्ग कविता, ललितलेखन, अनुवाद अशा विविध अंगांनी केलेल्या लेखनाने मराठी भाषेचं साहित्य अधिक समृद्ध करण्याचं  श्रेय त्यांच्याकडे जातं यात शंकाच नाही.

शाळेत असताना..

गडद निळे गडद निळे जलद भरुनी आले...

या कवितेतून निसर्गाची ढग भरुन आल्यापासून ते कोसळेपर्यंतच्या अवस्थांतराच्या यथार्थ वर्णनातून बा. भ. भेटले नि मग हळूहळू मनावर पसरतच राहिले..

मृगाच्या प्रत्येक पहिल्या पावसाबरोबर पुन्हा पुन्हा भेटत राहिले..

आम्हीही तारुण्यात पाऊल ठेवलं नि जपानी रमलाची रात्र.. उमजू लागली...

पुढे जाऊन

त्यांच्या 'बांगडी'तून  उमटणाऱ्या किणकिणाटातून भारतीय स्त्री जीवनातले असंख्य सूर भावू लागले.

मानवतेचा वेध घेणारं...

जीवन त्याना कळले हो वाचण्याची आंतरिक उर्मी अस्वस्थ करु लागली.

समुद्र होवोनी चंद्र लेखावा

चंदन होवोनी अग्नी भोगावा...

म्हणत त्यांनी सांगितलेलं, जीवनाला सामोरे जाण्याचं तत्त्वज्ञान सहज सोप्या भाषेत कळू लागले...

आयुष्यातले प्रश्न सोडवताना खचून नं जाता...

जळण्यातही सुख आहे ज्वालातुनी फुलण्याचे...

या त्यांच्या ओळी नेहेमीच धीर देत राहिल्या आणि जगण्याचा नवा दृष्टिकोन देत राहिल्या.

आणि एक दिवस जपानी रमला... पस्तीस वर्षांनंतर पुन्हा एकदा हिप्पीण होऊन आली... तिच्या आठवणीसह..

ढासळलेल्या बुरुजावर कोसळती लाटा..

म्हणत तिच्या उरातलं दुःख त्रास देत राहिलं...

असुनी सौंदर्य देही ती स्वतःत नाही

चांदण्यातही तुडुंब होरपळे दाही...

या ओळी पाठ सोडेनात.

मराठीतच नव्हे तर इंग्रजी, पोर्तुगीज आणि गोवेनीजमधेही
त्यांच्या संचाराने  माझं मन अचंबित होत राहिलं.



अन् मग...

बाकीबाब आमचीही मनं त्यांच्या
कवितेसारखीच चिरतरुण करुन गेले...

अविरत तारुण्याच्या ओंजळी उधळत
राहिले त्यांच्या काव्यातून..

# सम.....

प्रिय तू...

आज थोडं सांगितिक बोलूया?

माझ्या समाधानासाठी?

विलंबित एकतालात पायरी पायरीनं एक एक स्वराची खुशामत करत... कधी न्यास कधी आंदोलनं.. कधी वक्र रुपात मांडणी.. तर कधी... स्थिरपणे स्वरांचा आकारातला उच्चार करत... आजकाल अभावानंच ऐकू येणारा.. ब़डा ख्याल सुरु असताना.. जणू गानसमाधी लागली... अन् आवर्तनाच्या शेवटाचं नेहेमी येणारं चिरपरिचित ति. र. कि. ट...

संपून. धिन्... झालं तरीही मुखड्याची सुरवात होईना...

त्या क्षणापासून ते समेला पोचेपर्यंतची अस्वस्थता... फार जीवघेणी असते..

विद्युल्लतेच्या वेगानं एक छोटीशीच पण हृदय पार आरपार छेदून जाणारी एक तान अन् सहजतेनं गाठलेली सम...

मोठा थरारक अनुभव...

सम गाठल्याचा अपार आनंद आणि... एकदम रिलॅक्स फिलींग...

कशी मजा असते नं...

या समेत काय विलक्षण सामर्थ्य असावं... एका आवर्तनाची पूर्ती.. अन् दुसऱ्याची सुरवात असा एक अनोखा क्षण असतो...

असा विचार करता करता दुसरं आवर्तन संपत  आलं नि एक छानशी तिहाई घेऊन... समेपर्यंत पोचूनही सम नं घेता...

हवेत फक्त हात उडवून... मोकळीक...

अरे...

रसिकांच्या मनातली ही समेची जागा पार हातानं उडवूनच टाकलेली..

अन् तरीही आवर्तन पूर्ण झाल्याचा स्वर्गीय आनंद मनात पूर्ण पसरलेला...

या तिहाईची भारी फरपट होते असं वाटतं मला... कितीकदा तालाला सांभाळून घेत असते बिचारी...

तीनदा पुनरुच्चार...

कधी वेगाने.. कधी रमत गमत...

मधल्या ओळीचं नुसतच जागा भरुन काढण्याचं काम... अन् भाव खाऊन जाणारी... तिसरी ओळ... कारण सम गाठण्याचं शेवटचं ओझं तीच वहात असते.. ऐकणाऱ्याला... हुश्श... करणारा तो क्षण... सम गाठण्याचा...

गाणारा मजेत गातो... साथीदार  मात्र एक नजर रोखून त्याची   body language ओळखता ओळखता... स्वतःला मिळालेल्या एखाद्या क्षणाचं सोनं करु पहात असतो. स्वतःला सिद्ध करु पहात असतो त्याच्यामागून अर्धा सेकंद अंतरावर जसाच्या तसा स्वरमहाल बांधत असतो अन् एका क्षणी हे अर्ध्या सेकंदाचं अंतर शिताफीने कापून टाकत गायकाच्या बरोबरीने गाठतो... ती सम...

आणि जणु त्या क्षणी गायकाचा स्वर... वादकाचा स्वर आणि तालाचे  बोल सर्वांचच एक अद्वितीय अद्वैत साधलं जातं तो अत्युच्च आनंदाचा क्षण म्हणजे सम...

कितीदा सम गाठता येते   आयुष्यात... यावरच तर सारं अवलंबून असतं नं... ती गाठताना असणारी सहजता... एक आखीव रेखीव preplanned आयुष्य...

तरीही कधीकधी सम गाठताना  होणारी दमछाक पेलताना कामाला येणारी तिहाई... तिचंही महत्त्व नाकारता येत नाही...

अन् म्हणूनच...

तू जरी सम असलास तरी माझ्यासारख्या तिहाईचं अस्तित्व नेहमी साथीदारासारखच थोडंफार मागून चालणारं तरीही रंगत आणणारं.. नि आधार देणारं असतच हेही नाकारता येणार नाही.

खरं ना?...

तुझीच...

स्वर साध्य.. सूर माध्यम असं मानणारी...

मी...

# तुझ्याविना …. ??,

प्रिय तू…

आज खूप दिवसांनी…

म्हणजे तुला काही विसरले बिसरले नव्हते, पण एकतर छान शब्द सुचण्याइतका निवांतपणा नव्हता नि कसंबसं लिहून टाकणं… मला नाही रे जमत.. ते नं.. असं आतून अगदी पोटातून.. मनाच्या गाभाऱ्यातून की कसं… ते यावं लागतं.

पण एक खरं.. अंतर्मनात तुझा सतत वावर असतोच बघ… म्हणजे काहीतरी छानसं घडलं.. काही बिघडलं.. कुणाला तरी काहीतरी सांगावसं वाटलं की हटकून तुझी फक्त तुझी आठवण येते नि मग एकदा स्वतःच्या मनातच डोकावून सगळं एकदा सांगून टाकलं की कसं वाटतं… ते तुला रे कसं कळणार?

छान म्हणजे अगदी छान वाटतं मोकळं वाटतं हलकं वाटतं.. जे हवं ते समज..

माझं नाहीच रे पान हलत तुझ्याशिवाय…

आता हेच बघ नं… मला नं परवा एक कविता होत होती… सगळं कसं झरझर उतरलं… मनातून कागदावर.. वाटलं..

झाली…

पण नाही ना… एक शब्द नडला… किती विचार करुनही काही पसंतच पडेना.

कितीतरी वेळ मग नुसतीच घालमेल… चार सहा शब्द ठेवून पाहिले.. पण छे… भट्टी काही जमेचना.. मग आठवलास तू… म्हटलं यानं काहीतरी सुचवलं असतं… तू शब्दाच्या आडून आडून फिरशील मला दहादा विचार करायला लावशील. नेमका शब्द मात्र मलाच सुचायला हवा हा अट्टाहास असेल तुझा… हे सगळं सगळं माहीत असूनही त्याक्षणी फक्त तू… च आठवलास ना मला…

मग असा एकदम शिंपला उघडावा न् मोती दिसावा आतला… मोतिया रंगाचा.. तेजस्वी तस्सा शब्द दिसला बाई मनाच्या canvas वर.. न् मग काय आनंदले म्हणून सांगू…

म्हणजे सुटकेचा निःश्वास.. वगैरे वगैरेही नाही. direct परमानंदच... शब्द सुचल्याचा रे... आणखीन कसला...

म्हणजे आता तू तसाही नसतोसच बरोबर... पण असतोसच...

म्हण... मनु वेडी आहेस का ?

असतोस की नसतोस ठरव ना एकदाच काय ते...

हे असं सारखं अगम्य भाषेतलं बोलणं.. कोडी सोडवता सोडवता तुझ्या बोलण्यातली.. मूळ मुद्दाच विसरतो मी. अन् मग काहीतरी कबूल करुन बसतो माझ्याही नकळत..

मला तर वाटतय हे असं गोंधळलेलं बावरलेलं पहाणं तुला आवडत असावं...

असो...

सायबा... असू देत...

रंगत वाढते रे सगळयातलीच. म्हणजे कविता जन्मणं हा सोहळा असायला हवा... हे माझं म्हणणं तुला पटलेलं असतं पुरेपूर...

अन् तो साजरा होतो असा एका क्षणी... तेव्हा मात्र मी कधीच एकटी नसते...

नसतोस नाही...

असतोसच... तू.. माझ्या बरोबर...

# वीरपत्नीचे मनोगत....

मौनात गुंतलेल्या कितीतरी आठवणी...
तुझी चाहूल लागताच बोलू लागतात...

बांधाचीही परवा नं करता...
ओसंडून वाहू लागतात
आठवणींचे पदर अलगद उलगडू लागतात
अन् रेशमाची वीण दिसू लागते स्पष्ट.
सहज... गुंत्याविना.. झालेली मनाची मनाशी गुंतवणूक...
संगत... सोबत... साथ...
या शब्दांचे अर्थ.. सार्थ ठरवणारी...
त्यांचे अर्थही खरे उमजले... तुझ्याचमुळे..

कशी असायला हवी रे साथ ?
एकदा विचारलं होतं मी ..
मग खळखळून हसणं...
दाट मौन...
आणि फक्त हातात हात...
मौनाचीही एक सुरेख सुरेल भाषा असते..
हे नं सांगता कळलं...
ते.. त्या क्षणी

नं सांगता सवरता, बोलाबाला नं करता स्वतःच्या वागण्यातून आदर्श निर्माण करणं.. हा तुझ्या जिव्हाळयाचा विषय..

आक्रस्ताळेपणाला कधी थाराच नव्हता.

लोकांच्या पुढंपुढं करणं हे जसं अमान्य होतं तसच कुणाला मदतीचा हात पुढं नं करणं.. हेही अमान्यच...

आपणच आपल्या माणसाला कधीकधी ओळखण्यात उशीर करतो...

हे तेव्हा नाही कळलं ...

त्यालाही आता उशीरच झालाय खरा तर...

तू किती मोठा आहेस.. हेच मुळी उशीरा कळलं..

माझ्यापेक्षा समाजाला तुझी जास्त गरज होती, हे आता पटतय..

मला फक्त माझाच हक्क वाटायचा तुझ्यावर..

मन वाचणं ही तर तुझी खासियत होती. मग माझं मन त्याला जसं अपवाद नव्हतं... तितकच समाजमनही...

पण त्या दोन्हीची गल्लत नं करता न्याय देण्याचा तुझ्या परीनं जरी प्रयत्न केलास तरीही अखेर समाजमनाचं पारडं जास्त जड ठरलं...

नि ओघानं... घरापासून दूर दूर जात राहिलास.. संसारिक जबाबदाऱ्या ही नक्की पार पाडणार अगदी निगुतीनं.. या खात्रीनं..

मीही तुझ्या विश्वासाला तडा जाऊ नये म्हणून आटोकाट प्रयत्न केले..

अन् तुझ्याबरोबर मीही सुजाण कधी आणि कशी होत गेले कळलंसुद्धा नाही रे...

आणि मग या सुजाणतेच्या जाणीवेशी फारकत नं घेता निमुटपणे साथ देत राहिले तुलाही...

कारण... 'साथ' कशी असते हे नं सांगता समजवण्याचा तुझा त्या दिवशीचा क्षण जसाच्या तसा जपला मी हृदयात... आजवर... कोणतीच शंका नं घेता.. अविश्वास नं दाखवता...

तुझ्या स्पर्शाचा... तो अखेरचा क्षण...

सीमेवर लढतानाही...

मागे जीव गुंतवण्याचं पाप मनातही नं आणता.. वीरमरण स्वीकारलस तू...

खंत नाहीच रे तुझा सहवास नं मिळाल्याची...

त्या एका क्षणीच सारं उपभोगलं होतं सुख..

आणि बाकी कोणालाच नं कळणारा... साथ शब्दाचा अर्थ..

एकच सांग...

मीही सार्थ ठरवला ना रे ?

तू मौनातच दिलेल्या उत्तराचा अर्थ?

कदाचित् त्याचं उत्तरही मौनातच असावं तुझ्या...

# डागडुजी.... मनाची

आज थोडा निवांत वेळ मिळाला... म्हटलं चला... थोडीफार डागडुजी करु... पडझड झालेली जराशी पुन्हा लिंपून टाकू.. थोडी रंगरंगोटी करून तयार करु मनाला... पुन्हा उभं रहायला...

आवराआवरीत सापडलं.. एक स्वप्न...

थोडंसं चुरगळलेलं... तरीही... त्या दिवसांची आठवण करुन देणारं..

एक कविता... कुणालाच नं दाखवलेली..

अस्फुट शब्द..

थोडी उत्स्फुर्ततेची किनार आणि उत्कटतेची झालर...

आता उसवत निघालीये...

त्यालाही... चार टाके घालावे म्हटलं...

सारंच फाटण्याआधी..

आणि काय सांगावं...

या खटपटीत नवं काही सुचायला लागलं...

सारंच्या सारं आठवायला लागलं..

नव्याचे वेध अन् जुन्याच्या आठवणी...

छान उबदार गोधडीच झाली की त्याची...

हं...

म्हणजे..

प्रतिभेनं अजून पुरता निरोप नाही घेतलाय म्हणायचा...

थोडी विश्रांती घेतली होती वाटतं...

आणि स्वप्नांचं काय बरं...

द्यावी का साद तुला पुन्हा एकवार?

स्वप्नं एकटीनं पहाणं तसं तेव्हाही मला मान्य नव्हतं... नि आताही...

त्यांची पूर्ती होवो वा. नं होवो...

पण त्यासाठीची धडपड...

ती सुद्धा किती enjoy करण्यासारखी असते... या एका बाबतीत मात्रं.. तुझं माझं दुमत कधीच नव्हतं आणि हाच एक धागा पकडून मनानं.. पुन्हा एकदा साद घातली आणि...

फिकुटलेली सारी स्वप्नं स्पष्ट दिसायला लागली...

वाटलं... तू नक्की असणार.. इथेच कुठेतरी... अवतीभवती.

अन् अलगद हात आला नं तुझ्या हातात...

आता पाहू पुन्हा स्वप्नं.. नव्याने...

त्याला उत्स्फुर्ततेची किनार अन् उत्कटतेची झालर असलेलं...

मनाची डागडुजी अगदी... perfect जमली वाटतं...

जगण्यासाठी इतकं पुरेसं असतं मला वाटतं..

# End stage disease, ..

अटळ मृत्यू   त्याचा...

आणि ते सोसणारी... धैर्यवती... ती...

आज तुझी आठवण येतेय. मनाची खिडकी उघडीच राहिली वाटतं.. डोकावलीच की त्यातून.. कितीही नाही म्हटलं तरी...

पण सारी कवाडं.. मी तर घट्ट लावली होती...

मग.. तो फक्त भास होता?

पणअसू दे...

मला छान वाटतय आज...

नुसत्या आठवणीनेही...

कसं असतं नं... घटना तीच असते.. पण वेळ काळ स्थळ बदललं.. की तीच वेगळी भासू लागते... कधी भरभरुन आनंद देते.. नि कधी उदास करते...

तुला आठवतं?

आपण असच एकदा पहाटे फिरायला निघालो... बोचरी थंडी होती... पण नव्हती जाणवत...

हातात हात होता नं तुझा...

मनही भरलेलं होतं...

आजूबाजूच्या जगाचं मुळी भानच नव्हतं..

दुतर्फा मस्त डवरलेले वृक्ष... आणि त्यामुळे अधिकच थंड हवा..

पानं अधेमधे हलत होती... बिचारी तीही काकडली होती वाटतं..

आणि त्या पानांना लटकलेले दवबिंदू... कसे झुंबराच्या लोलकांसारखे हलत होते...

खाली पडण्याच्या नि पानांपासून दूर होण्याच्या भयानं अधिकच लगटून होते... कुठेतरी माझंच प्रतिबिंब पाहिलं मी त्यात आणि तुझ्या हातावरची पकड अजूनच घट्ट केली मी.. जाणवलं होतं ते तुलाही... कळत होतं नं मला..

ते चकचकीत, थोडेसे लांबलेले दवबिंदू... सगळं कसं स्वच्छ दिसतं नं त्यात?

पारदर्शक असतात ते आणि म्हणून आवडतात मला...

किती लांबवर चालत राहिलो आपण..

पक्षी किलबिलायला लागले... पूर्वेला.. तांबडं फुटायला लागलं..

रात्रीच्या चांदण्या पेंगुळल्यासारख्या झाल्या.. नि एक एक करुन लुप्त होऊ लागल्या...

शुक्राची चांदणी मात्र बराच वेळ दिसत होती.. लख्ख... प्रकाशमान... लुकलुकत राहिली होती... माझ्या मनातल्या आशाकिरणासारखी...

मग ती क्षितीजावरची लाली... हळूहळू वर येणारा सूर्य आणि त्याची उबदार.. तेजस्वी सोनेरी किरणं...

सारं वातावरणच बदलून गेलं..

सारं जग मोठया उत्साहात नव्या पहाटेचं स्वागत करायला सज्ज झालं.. पण मला हे पहाट होतानाचे क्षण गमवायचे नव्हते..

घट्ट पकडून ठेवायचे होते... नको होती मला सकाळ... तू जाशील... ही भीती सतत पाठलाग करत रहायची नं... तेच तर नको होतं खरंतर मला...

हा वियोगाचा योग.. यायचाच होता...

माझ्या नको म्हणण्यानं.. काही घडायचं रहाणार नव्हतं...

तुझीही हातावरची पकड घट्ट होत चालली तसं मन गलबलून यायला लागलं. पण निकरानं सारच नाकारत होते.. अश्रु.. हुंदके..

आवंढे... तुझा निरोप मला असा नको होता...

शांतीमंत्राचा मन

उद् घोष करत होतं..

पूर्णमदः पूर्णमिदम्....

पूर्णातूनच उत्पत्ती अन् पूर्णातच विलय...

आत्म्याचं परमात्म्यात विलीन होणं...

वाटलं... फक्त काही काळ.. हे असंच इथं थांबावं...

अन् तुझी एकच हाक यावी.. मनु...

भासच की काय हा...

ते सगळं पचवण्याची ताकद कुठून आली... खरंच मला कधी कळलच नाही...

सोसता आलं सारं... तुला हेच हवं होतं नं..

मग मी बंद करुन घेतली मनाची सारी कवाडं.. घट्ट... अगदी घट्ट... नकोच तुला आता असंही गमवायला... आठवणीतून सुद्धा...

मग लक्षात यायला लागलं... अरे तू तर आहेसच की माझ्याजवळ...

लौकिकार्थानं नसशीलही कदाचित्. पण मला माझ्यापुरता बास होतास की इतका...

मग एकटेपण जाणवेना झालं...

एकाकीपणाची भीती वाटेनाशी झाली... आणि मग...

आज...

तुझ्या आठवणीलाही.. मी मोकळीक दिली... मुभा दिली... बाहेर जाण्याची...

पण... नाही गेली ती..

तुझ्यासारखी सोडून मला...

आणि मग...

सारं आकाशच भरुन गेलं तुझ्या आठवणीनी...

पुन्हा एकदा जगण्याची उभारी देत...

आठवण यायलाच हवी... तिथंच भेटतोस नं आता...

आठवण... तशीही... यायलाच हवी...

# आयुष्य……प्रश्न …की उत्तर…

एका क्षणी आपल्याला वाटतं... काय आयुष्य आहे यार... किती धावपळ.. किती अडथळे.. किती काळ चालणार हे असं.. सारख्या अडचणीच अडचणी...

पण मग लक्षात येतं... अरे आपण ज्याचा बाऊ करत होतो त्या अडचणींचा आपण अगदी यशस्वीपणे साफ पाडाव केला की... म्हणजे जमतं की यातून बाहेर पडायला. उगाचच घाबरत होतो.. मला वाटतं confidence develop झाला की शारिरीक क्षमताही वाढत असावी..

काय आधी काय नंतर अशी टाईम मॅनेजमेंट करता यायला हवी. कशाची गरज आहे कशाची कमी कशाची जास्त याचं कोष्टक जमायला हवं.

कशाकडे दुर्लक्ष करायचं नि कशाला प्राधान्य द्यायचं हे कळायला लागलं, . की निम्म्या प्रश्नांची उकल होते... काहींची solutions सापडतात आणि काही.. हे सोडवलेच पाहिजेत असा अट्टाहास नं करता सोडून देता येऊ लागतात..

आणि मग एकदा का याची सवय लागली, की प्रश्न ... हाच प्रश्न उरत नाही.. कधी ना कधी तो नक्की सुटेल हा विश्वास वाटू लागतो नि एखाद्या बेसावध क्षणी पटकन उत्तर सापडून जातं.

मला वाटतं कधीकधी आपण उत्तराच्या शोधाऐवजी प्रश्नामागेच धावत रहातो नि.. भित्यापाठी ब्रह्मराक्षस अशी काहीशी अवस्था होते.

म्हणून त्याचं अवास्तव अवडंबर नं माजवता

उत्तरामागे धावणं.. की प्रश्नामागे... हे एकदा निश्चित झालं... की झालं...

एखाद्या प्रश्नाला कदाचित् एकाहून जास्त उत्तरं असतील उत्तरांचे मार्ग वेगळे असतील. compitative exam मधे नाही का चार पैकी दोन पर्याय पटकन बाजूला होतात.. आणि उरलेले दोन मात्र इतके जवळजवळचे असतात... की होऊन जातं ना confusion . तसंच होतं कधीकधी . एकदा एक मन म्हणतं हे बरोबर .. दुसऱ्या क्षणी उरलेलं उत्तर बरोबर वाटू लागतं.

पण अगदी नेमकं उत्तर शोधावं लागतं.. नाहीतर...

negetive marks.. आणि पदरी शून्य...

अशा प्रश्नांची solutions मात्र सावधपणे आणि अभ्यासपूर्वक शोधायला हवीत.

जमतं तेही सरावानं.. इच्छा मात्र हवी...

एक मात्र खरं..

आयुष्य प्रश्नचिन्ह नसून निसर्गाने विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर आहे.. प्रत्येकानं आपापल्या परीनं सोडवण्याची तिथे मुभा आहे आणि त्याचा आनंद उपभोगण्याचं स्वातंत्र्यही...

पहा पटतय का...

## श्रावण....

श्रावणातली हवा... नुसती पावसाळी नसते हो ती..

किती रुपं असतात तिची.. किती वेगवेगळया छटा असतात... मनाला लगटून बसलेल्या आठवणीदेखील असतात सोबतीला...

क्षणात पाऊस येईलसं वाटतं इतकं झाकोळून येतं.. नि मनाची अन् पाऊस झेलण्याची तयारी होण्याच्या आतच एखादी सर झरझरुन जाते नि सगळं पुन्हा एकवार स्वच्छ... जणू कोणाच्या आठवणीनं डोळे भरुन यावेत.. समोरचं अस्पष्ट दिसू लागावं नि आवंढा गिळून टाकताना नकळत पापण्याही मिटल्या जाऊन पटकन चार दोन अश्रू गालावर ओघळावेत आणि पुन्हा एकवार मन मोकळं व्हावं... मनाचं आकाश निरभ्र व्हावं.. तसंच... अगदी तस्संच, ... सेम टू सेम...

आता मृद्गंध नसतो फारसा... पण अनेक रंगी अनेकविध सुवासाची देखणी फुलं सुसज्ज होऊन वाट पहात असतात...

नि हवेत मिसळलेला हा गंध नक्की कोणाचा.. असा संभ्रम पडावा इतके विविध सुवास असतात. माझी लाडकी शुभ्र पांढरी जुई, डवरलेला सुवर्णरंगी सोनचाफा... फुलबाजाराजवळून जाताना नसली घ्यायची फुलं, तरीही अडखळतोच पाय थोडासा... या सुगंधांची सर नाहीच येत हो सेंटला... कितीही महाग असलं तरी...

उन्हाळयात येणारी पश्चिमेच्या वाऱ्याची झुळुक जितकी अनमोल असते तितकीच... A/C च्या वाऱ्यातला नकली थंडावा.. देतोही तसं थोडंफार सुख.. पण त्या मंद झुळुकीचा स्पर्श कसा नकळत... आ... हा... म्हणायला लावतो ना... ती मजा... खास ठेवणीतल्या भाषेत सांगायचं तर... लईच भारी असते बाबा...

श्रावणातली हवा... म्हणजे गूळ घालून शिजवलेल्या  पुरणाचा वास... नि पुरणाच्या आरत्या करुन जवळ असलेल्या नि दूरवर असलेल्या लेकरांना ओवाळण्याचा वास...

मला आठवतय...

श्रावण शुक्रवारी एकदा संध्याकाळपर्यंत दोन्ही मुलं वाट पहात राहिलेली उपाशी...

आई आली हाॅस्पिटलमधून की ओवाळेल मग आम्ही जेवू म्हणत...

आता.. घराच्या चारी कोपऱ्यात ओवाळते... लवकरच आवरतं सारं.. मुलं नसतातच जवळ.. तरीही लवकर ओवाळण्याचा आटापिटा... तिकडे पोरं उपाशी राहू नयेत म्हणून...

राखीपौर्णिमाही येते...

पूर्वी भाऊ असायचा गावातच... भेटायचा..

आता तो ही गेला दुसऱ्या गावी रहायला..

मुलांचीही राखीपौर्णिमा..

मला कार्टूनवाली राखी हवी असा हट्ट... ताम्हन नि निरांजनं हातात मावत नसली तरी स्वतः ओवाळण्याचा लेकीचा अट्टाहास... सगळच इतिहासजमा...

आता पोस्टाने पाठवायच्या म्हणून राख्यांची खरेदीही लवकर नि पाठवून झालीये आता... म्हणून राखीपौर्णिमेलाही फोनवर गळा दाटलं बोलणं झालं... की झाला सण साजरा...

परवा भाऊही भेटला नि लेकसुद्धा... दोघांच्याही मनगटावर रंग उडालेले दोरे... अरे कसले रे हे ?काढून नाही का टाकायचे म्हटलं... तर दोघांचही एकच उत्तर ...

माझ्या बहिणीने पाठवलेली मागच्या वर्षीची राखी आहे ती... तिचा हा रेशमी धागा.. रंग उडू दे गं पण त्यातलं प्रेम तर तसच आहे ना...

आणि मग...

बरसल्या ना हो श्रावणसरी.. पुन्हा एकदा... सरसर...

डोळ्यातून ओघळल्याच.. कितीही थोपवल्या तरी...

नि पुन्हा एकदा निरभ्र आकाश... नि मनसुद्धा...

श्रावणातली हवा.. अशीच असते...



# आजी.....

आजी......

अवघ्या १६व्या वर्षी विधवा झाली ती आणि सटवाईनं पाचव्या दिवशी लिहिलेल्या भविष्यानुसार तिचं कुंकू ललाटावरुन हद्दपार झालं... आयुष्याच्या बेरीज वजाबाकीत उपभोगातील फक्त 'भोग'च बाकी राहिले. जीव जगण्यापुरतं अन्न, शरीर झाकण्यापुरते कपडे, अपार कष्ट. अतीव दुःखाने डोळ्यातले अश्रूसुद्धा पार गोठून गेलेले...

सुमारे१००वर्षांपूर्वीच्या तिच्या काळातील बहुतांशी स्त्रियांची थोड्याफार फरकाने हीच कहाणी...

२ वर्षांचं एकुलतं एक मूल पदरात टाकून आजोबा परलोकी गेलेआणि  आजीनं एकटीनं माझ्या वडिलांना मोठं करण्याचं शिवधनुष्य खंबीरपणे पेललं.

लहानपणी आजीजवळ झोपायला आवडायचं मला. पण ती झोपायची कांबळ्यावर. आजी, टोचतं गं मला ते.. मग स्वतःच्या ९वारी लुगड्याची चौपदरी घडी घालायची त्यावरआणि मला जवळ घ्यायची..

सतत कामात गुंतलेली.. पहाटेच उठायची. अंगणात सडा देवापुढे रेखीव रांगोळी, तोंडी विठ्ठलाचे नामस्मरण..

सगळयांची जेवणं झाली की मग सोवळ्याने तिचा स्वयंपाक.. तो तरी काय.. भात थालिपीठ असा एकच पदार्थ.

चुलीवरची तिची फुगलेली हातावर थापलेली भाकरी. काकडी भोपळा घालून केलेलं थालीपीठ काय झक्कास लागायचं.. सगळं जेवण होऊनही तिच्यातल्या घासासाठी तिथेच घुटमळायचो आम्ही. भाताची खरपुडी तर काय चविष्ट लागायची विचारुच नका. महिन्यात २४उपवास. खिचडी काय बनवायची... पदार्थ कितीही कमी असो, आम्हाला घास दिल्याखेरीज तिच्या घशात उतरायचा नाही. आम्हीच काय, शेजारच्या शंभोच्या देवळातल्या पुजाऱ्याला सणावाराचं ताट आधी पोचवावं लागायचं तेव्हा ही जेवणार..

माझी आई लग्न होऊन घरी आलीआणि आजीचं आयुष्य पालटायचा तिनं आटोकाट प्रयत्न केला. काही वर्षे लागली पण आईनं प्रयत्न सोडला नाही.

लाल आलवणाच्या जागी हलक्या रंगाची नऊवारी आली. संस्कृत घेऊन BA आणि BEd झालेली माझी आई college मधे नोकरी करायची. पहिल्या पगारातून आजीसाठी तिने एक शुभ्र पांढरी साडी आणि दोन blouse शिवले.

कांबळयावर जमिनीवर झोपणं बंद करुन कॉटवर गादी आली. जेवायला एका पदार्थावरुन २/४ पदार्थ दिसू लागले. विठ्ठल मंदिरातठेवायला रोज पैसे मागण्याऐवजी महिन्याच्या १ तारखेला बाकी खर्चाबरोबर आजीलाही आई पैसे देऊन ठेवू लागली. आजीनं आत्मसंमानानं जगावं असं तिला वाटायचं.

एक गोष्ट मात्र नाही बदलता आली तिला...

प्रत्येक महिन्याच्या एका रविवारी...

आजीला निरोप जायचा. 'तो'आलाय..

नेहमी शांत असणारी आजी अचानक चिडचीड करायची. घरी एक दीड तास स्मशान शांतता. आजीला एका खोलीत न्यायचे. आई सोबतीला. उत्सुकतेपोटी एकदा चोरुन पाहिले होते... खाली मान घातलेली आजी आणि तिच्या डोक्याचे मुंडण करणारा न्हावी... आजवरच्या आयुष्यात याहून भयानक गोष्ट मी पाहिली नाही..

आई दादांनी तिला तिच्या आवडत्या विठ्ठलाचे पंढरपूचे दर्शन घडवले, काशी यात्रा रामेश्वर झाले. दादांनी तिच्या बाकी आयुष्यात काहीच सोहळे झाले नाहीत म्हणून पहिला पणतू झाल्यावर 'पणतू' समारंभ केला.

लग्नात केसातल्या सोन्याच्या फुलापासून सोन्याच्या दागिन्यांनी मढलेली माझी आजी, आजोबा गेले तशी लंकेची पार्वती झाली. त्यानंतर पणतू झाला तेव्हा दादांनी सोन्याची फुलं उधळली

तिच्यावर, तेव्हा सोनं लागलं तिच्या अंगाला. एक दत्तगुरु असलेली अंगठी केली तिच्यासाठी आणि पाणी प्यायला चांदीचं भांडं.. किती खूष झाली होती ती...

आजीच्या डोळयांत पाणी कधी पाहिलंच नव्हतं. पण माझ्या आईला मी ६/७ वर्षाची आसताना धनुर्वात झाला आणि डॉक्टरांनी तिच्या आयुष्याची शाश्वती नाही सांगितलं तेव्हा एकदाच मला आणि माझ्यापेक्षा २ वर्षांनी लहान संयुक्ताला जवळ घेऊन रडलेली पाहिली तिला.

कडक सोवळं असणारी आजी आईच्या या आजारपणात 'त्या ' चार दिवसात कपडे बदलण्याचं कामसुद्धा आनंदानं करायची.

सासू सुनेचं असं अनोखं नातं विरळच...

तिच्या सोवळयाबद्दल तिला कोणीही बोलायचं नाही असा आईचा फतवाच होता.

शेवटच्या क्षणी १ दिवसासाठी गावाला गेलेली आई परत येईपर्यंत यमालादेखील थोपवून धरलं तिनं.. आई दादा परतलेआणि लगेचच.. येते रे बाबा विठ्ठला... म्हणून ९२ वर्षाची माझी आजी १६ वर्षापूर्वी, आईचा हात हाती घेऊन महायात्रेला गेली शांतपणे...

आजीचा जन्म धुळवडीचा. पण सगळयांच्या आयुष्यात रंगपंचमीच्या सप्तरंगांची उधळण करुन गेली.

गंगा भागीरथीइतकीच पवित्र..

'यमुना गोपाळ जोशी' नावाची

माझी आजी....

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची आठ, अविनाश नगरकर यांची चार, डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांत:सुखाय” लिहीणारे

उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनीळ सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान